## संपादकीय

### पुस्तकांचा नवा अवतार

पुण्यातील ब्रिटिश लायब्ररीने २३ एप्रिल रोजी, जागतिक पुस्तक दिवसाचा मुहूर्त साधून कॉम्पॅक्ट डिस्क - सीडीच्या स्वरूपातील नव्या ग्रंथविभागाचे उद्घाटन केले. आपल्या सदस्यांना पहिल्याच दिवशी दोनशेवर सीडी उपलब्ध करून दिल्या.

भारताचे राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख या आत्मकथनाची गिरीश कर्नाड यांच्या आवाजातील सीडी त्यात होती; त्याच प्रमाणे अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या 'माय लाइफ'ची सीडी त्यांच्या दस्तुरखुद्द आवाजात ऐकता यावी अशीही सोय होती. डेव्हिड बेकहॅम या नामवंत क्रीडापटूचे 'माय साइड' हे आत्मकथनही सीडीच्या स्वरूपात त्याच्याच आवाजात ऐकता येते; तो जणू आपल्यालाच एकट्याला आपल्या आयुष्यातल्या यशापयशाच्या गोष्टी आपुलकीने, प्रांजलपणे सांगत आहे असे त्याची ती सीडी ऐकताना वाटले तर नवल नाही. कुमार साहित्य क्षेत्रात जागतिक विक्रम करणाऱ्या हॅरी पॉटरच्या कादंबऱ्याही सीडीच्या स्वरूपात, श्रवणभक्तीने जाणून घेण्याची कल्पना वाचनाचा कंटाळा असणाऱ्या मुलांना एक पर्वणी वाटावी. शेक्सपियरची सगळी नाटकेही ब्रिटिश लायब्ररीत सीडीच्या स्वरूपात आता मिळू शकतात. ॲगाथा ख्रिस्तीच्या डिटेक्टिव्ह कादंबऱ्या, पी. जी. वुडहाऊसच्या नर्म विनोदी कथा, सर आर्थर कॉनन डॉयलच्या शेरलॉक होम्सच्या रहस्यकथा, वगैरे वाचण्यासाठी वेळ नाही अशी सबब आता सांगायला जागा नाही. त्या वाचण्यासाठी अनेक दशके पुस्तकरूपात उपलब्ध असल्या तरी अनेक रसिक त्यांचा आस्वाद घेण्यापासून वंचित राहिलेले असतील. त्यांनी आता त्याबद्दल हळहळ वाटून घेण्याची गरज नाही. कारण आता कारमधून जाताना किंवा घरी मोकळा वेळ असताना सीडीच्या रूपातील ही पुस्तके संगीताच्या कॅसेटप्रमाणेच विनासायास ऐकता येतील आणि त्यांचा आनंद घेता येईल.

ऑडिओ सीडीच्या रूपातला हा पुस्तकांचा नवा अवतार यापुढच्या काळात सर्वांनाच सोयीचा आणि हवाहवासा ठरेल; तसेच छापील पुस्तकापेक्षाही कमी किंमतीत आपल्याला उपलब्ध होईल. आज लोकप्रिय गाण्यांच्या शेकडो कॅसेटस एकेकाच्या संग्रही असतात, तशाच गाजलेल्या पुस्तकांच्याही शेकडो सीडीज् आपल्या घरात असणे ही नवलाईची गोष्ट उरणार नाही. नव्या चित्रपटांच्या व्हिडिओ कॅसेटस् मिळवणे आणि घरी व्हिडिओ कॅसेट प्लेअरवर बघणे हा जसा लाखो रसिकांचा आवडता उद्योग असतो, तद्वत उद्याच्या वाचकांना नव्या पुस्तकांच्या सीडीज् मिळवून त्या त्या पुस्तकातील कथावस्तूचा, नाट्याचा किंवा चिंतनाचा लाभ




घेणे हा जिज्ञासापूर्तीचा सर्वात सुटसुटीत, सोयीस्कर मार्ग वाटेल यात शंका नाही.

भारतात तर अशा ऑडिओ सीडीज्ना विशेषच महत्त्वाचे स्थान लाभणे अपरिहार्य आहे. भारतात अनेक भाषा प्रचलित आहेत; आणि साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. परंतु लिहिणेवाचणे येत नसले तरी श्रवण परंपरेने भारतात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञान आणि रामायण - महाभारत - पुराणादी सांस्कृतिक संचित संक्रमित होत आलेले आहे. कीर्तन-भागवतकथा-प्रवचने कथाकथन,पारायणे यातून रामचरितमानस, ज्ञानेश्वरी, गाथा, कबीराचे दोहे, मीरेची भजने ही पिढ्यानुपिढ्या येथील सर्वसामान्य स्त्रीपुरुषजनांचे उद्बोधन करीत आलेली आहेत; आणि अक्षराचा गंधही नसलेल्या अडाण्यातल्या अडाणी माणसालाही मुखोद्गत होत राहिली आहेत. तेव्हा सीडीच्या स्वरूपात पुस्तकांचे श्रवण ही गोष्ट खरे तर स्वाभाविकच वाटायला हवी. पूर्वी प्रत्यक्ष मुखातून बाहेर पडणाऱ्या कथा-संगीताचे आता तंत्रज्ञानाच्या सुकरतेमुळे सीडीच्या रूपातले ध्वनिमुद्रण आपल्याला सहजपणे मिळवणे शक्य झाले आहे एवढेच! श्रवणभक्तीची परंपराच त्याद्वारे परिपुष्ट होत आहे.

वाचकांच्या दृष्टीने विचार केला तर वाचनाच्या जोडीने श्रवणाद्वारे पुस्तकाचा आस्वाद घेणे - एवढाच काय तो फरक म्हणता येईल. अर्थात वाचनाच्या प्रक्रियेत आणि श्रवणाच्या प्रक्रियेत काही मूलभूत फरक आहेच; आणि पुस्तकाच्या एकूणच व्यक्तिमत्त्वाचा, लिपीच्या वळणाचा, मुद्रण वैशिष्ट्यांचा, सजावटीचा आणि एकूणच वातावरणाचा प्रभाव पडत असतो. वाचून दाखवणाऱ्याचा आवाज, उच्चारशैली, पार्श्वसंगीत आणि एकूणच तांत्रिक बाजू यांच्यावर सीडीची गुणवत्ता ठरणार. भारतात मुद्रित पुस्तकांची बाजारपेठ मोठी असली तरी पुस्तकांचा प्रचार सुशिक्षित वर्गापुरताच मर्यादित आहे; आणि सुशिक्षितांमध्येही दोनचार टक्केच व्यक्ती काय त्या पुस्तकांशी आपले नाते जपताना दिसतात. दहा कोटी मराठी भाषकांमध्ये लाख दोन लाख प्रती खपलेली पुस्तके हाताच्या बोटावर मोजण्याइतकी देखील निघणे मुश्किल! गाजलेल्या चित्रपटातील गाण्यांच्या ध्वनिफिती - कॅसेटस मात्र लाखोंनीही खपलेल्या बऱ्याच आढळतील. तेव्हा सीडीच्या स्वरूपातल्या पुस्तकांना मुद्रित पुस्तकांपेक्षा अधिक मोठे मार्केट उपलब्ध आहे असे सकृत् दर्शनी तरी वाटते. प्रकाशनसंस्था आणि संज्ञापन माध्यमे सीडीच्या प्रसाराबाबत आणि वितरणाबाबत जी व्यूहरचना करतील तिच्यावर खपाचे प्रमाण व व्याप्ती ठरेल. परंतु एकूण जागतिकीकरणाचे आणि उदारीकरणाचे वातावरण पाहताना असे वाटते की छापील पुस्तकांपेक्षा सीडीच्या स्वरूपातील पुस्तकांना फारच व्यापक मार्केट लाभेल.

टीव्हीवरील वाहिन्यांची वाढती संख्या, वृत्तपत्रांचे वाढते खप, हिट चित्रपटांना मिळणारे प्रचंड उत्पन्न यावरून सीडीच्या खपाबाबतही आशावादी वृत्तीने अंदाज करणे गैर ठरू नये. हमतुम, वीर झारा आणि धूम हे तीन चित्रपट एका वर्षात काढणाऱ्या आदित्य चोप्रा यांच्या यशराज फिल्म्सने १३६ कोटी रुपये फायदा मिळवला; किंवा दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे ने मराठा मंदिरमध्ये ५०० आठवड्यांचा ऐतिहासिक विक्रम केला यासारख्या बातम्या पुस्तकांच्या क्षेत्रात हॅरी

पॉटर सारख्या परदेशी कलाकृतींच्या बाबतीतच शक्य वाटाव्या - असे यापुढे मानण्याचे कारण नाही. पेंग्विन इंडिया ही प्रकाशन संस्था आता मराठीतही पुस्तके प्रसिद्ध करणार आहे; वॉल्ट डिस्ने आणि स्टारटीव्हीचे रूपर्ट मरडोक भारतीय बाजारपेठेवर लक्ष केंद्रित करीत आहेत; स्कोलॅस्टिक प्रकाशन संस्थेने गेल्या सहा वर्षात हजारो शाळांमधून नेटवर्क उभे करून कोट्यवधी रुपयांची पुस्तके वितरित केली आहेत... ह्या सर्व गोष्टी एकूण ग्रंथव्यवहाराला आणि संपर्क माध्यमांना उज्ज्वल भवितव्य आहे - हेच सूचित करतात. त्यामुळेच सीडीच्या स्वरूपातील प्रकाशनाकडेही लक्ष देण्याची गरज आहे.



## इंटरनेटवरून साहित्यविश्व

* यंदाचा हॅन्स ख्रिश्चन अँडरसन पुरस्कार अमेरिकन समीक्षक हॅरॉल्ड ब्लूम याला कोपनहेगन येथे देण्यात आला. ६५१७५ डॉलर्सचा हा पुरस्कार आहे.

* मॉंट्रियल शहराला जागतिक ग्रंथ राजधानी म्हणून यंदा गौरविण्यात आले आहे. दि. २३ एप्रिल रोजी तेथील कलाकेंद्रात 'राजधानी' वर्षाचा शुभारंभ मोठ्या थाटामाटात पार पडला.

* एकोणिसाव्या शतकातील थोर कादंबरीकार चार्लस डिकन्स (१८१२-७०) याच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी ६ कोटी २० लक्ष पौंड खर्च करून थेम्स गेटवेजवळ एक थीम पार्क उभारण्यात येत आहे.

* गॅलिलिओचा इन्व्हेरियन्सचा गती सिद्धान्त प्रसिद्ध आहे. एका इटालियन शास्त्रज्ञाने असा दावा केला आहे की गॅलिलिओ (१५६४-१६४२) च्या आधी ३०० वर्षे डिव्हाइन कॉमेडी लिहिणाऱ्या डान्टे (१२६५-१३२१) याने हा सिद्धान्त आपल्या लेखनात विशद केला होता.

* प्रिन्स चार्ल्सच्या विवाह प्रसंगी जिली कपूर, रॉबर्ट हॅरिस आणि जॉन मॉर्टिमेर यांनी साहित्यक्षेत्राचे प्रतिनिधित्व केले.

* 'नो वॉर' हे इराकवरील पुस्तक नाओमी क्लेइनने लिहिले आहे आणि ते चांगले खपतेही आहे. परंतु या पुस्तकाला 'नो वॉर' हे नाव आपल्याला न विचारता दिले गेले म्हणून ती संतप्त झाली असून, या पुस्तकाचे मानधन आपण स्वीकारणार नाही असे तिने जाहीर केले आहे.



# साहित्यवार्ता




### * 'चाकाची खुर्ची'चा राष्ट्रपतींकडून सन्मान

अपंगांच्या आत्मप्रतिष्ठेसाठी झगडणाऱ्या कोल्हापूर येथील हेल्पर्स ऑफ दि हँडिकॅप्ड या संस्थेच्या प्रमुख नसीमा हुरजूक यांच्या 'चाकाची खुर्ची'ला राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी सन्मानित केले. एका वेगळ्या संवेदनेचे दर्शन घडवितानाच राष्ट्रपतींनी 'हेल्पर्स'च्या कोकणातील स्वप्ननगरीच्या उद्घाटन समारंभाचे निमंत्रणही स्वीकारले.

श्रीमती नसीमा हुरजूक यांचे 'चाकाची खुर्ची' हे आत्मकथन २००१ मध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले. या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद आशा देवधर यांनी केला असून, दिल्लीच्या विवेका फाऊंडेशनने तो प्रकाशित केला आहे. त्याचा प्रकाशन समारंभ नवी दिल्लीत झाला. प्रकाशन समारंभानंतर श्रीमती हुरजूक आणि पी. डी. देशपांडे या पुस्तकाची प्रत राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना देण्यासाठी राष्ट्रपती भवनात गेले. तिथे गेल्यानंतर त्यांना समजले की, राष्ट्रपतींपर्यंत हे पुस्तक आधीच पोहोचले आहे. नुसतेच पोहोचले नाही, तर राष्ट्रपतींनी ते वाचूनही काढले आहे. पंधरा मिनिटांच्या भेटीत डॉ. कलाम यांनी पुस्तकातील आपल्याला आवडलेल्या भागाविषयी आत्मीयतेने चर्चा केली. 'हेल्पर्स'ची जिव्हाळ्याने माहिती घेतली.

कोकणातील कुडाळ तालुक्यात मोरे (पो. वाडोरा) येथे 'हेल्पर्स'चा स्वप्ननगरीचा भव्य प्रकल्प उभा राहत आहे. या प्रकल्पाच्या उद्घाटन समारंभासाठी राष्ट्रपतींनी यावे, अशी इच्छा श्रीमती हुरजूक यांनी व्यक्त केली आणि क्षणाचीही उसंत न लावता राष्ट्रपतींनी हे निमंत्रण स्वीकारले. जागतिक अपंग दिनी येत्या तीन डिसेंबरला स्वप्ननगरीच्या उद्घाटन समारंभासाठी पाहुणे म्हणून येण्याचे त्यांनी मान्य केले. यानिमित्त सिंधुदुर्ग जिल्ह्यात राष्ट्रपतींचा दौरा होणार आहे.

सप्टेंबर २००१मध्ये प्रकाशित झालेल्या या मराठी पुस्तकाची आतापर्यंत दोन पुनर्मुद्रणे झाली आहेत. इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध झाला असून तेलुगु, हिंदी, गुजराती या भाषांतील अनुवादाचे काम सुरू आहे. राष्ट्रीय अंध कल्याण संघाने अंधांसाठी पुस्तकाची मराठी श्राव्य आवृत्ती प्रसिद्ध केली आहे.

## * बाबाराव मुसळे यांच्या 'वारूळ'चे प्रकाशन

''४९२ पानांची ही कादंबरी वाचून मी फारच प्रभावित झालो. गेल्या चार-दोन वर्षांमध्ये एवढी प्रभावी, एवढी चांगली कादंबरी मी वाचली नव्हती... ही कादंबरी आवडण्याची काही कारणं आहेत... ही कादंबरी विशिष्ट प्रश्न घेऊन लिहिली आहे. समाजजीवनामध्ये, राजकीय जीवनामध्ये, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये ज्या समस्या निर्माण होतात, त्या समस्यांचंच चित्रण आता केलं पाहिजे, ते करणं आवश्यक होऊन गेलं आहे. या समस्या इतक्या जटिल स्वरूपाच्या आहेत की, त्यांचा अभ्यास केल्याशिवाय लिहिताच येत नाही. आणि म्हणून बहुतेक लेखक समस्येच्या वाटेलाच जात नाहीत. कारण तसं करायचं म्हणजे त्या समस्येचा संपूर्ण अभ्यास करावा लागतो. आणि तो अभ्यास करण्यासाठी नुसती पुस्तकं वाचून भागत नाही. प्रत्यक्ष फील्डवर उतरावं लागतं. मराठी लेखकाची अजूनही फील्डवर उतरण्याची तयारी नाही...'वारूळ'मात्र याला अपवाद आहे. १९५७ ते १९८७ या कालखंडातलं महाराष्ट्रातलं सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय जीवन कशा प्रकारचं होतं याचा नेटका प्रत्यय हवा असेल तर तो या कादंबरीत पाहायला मिळेल... एवढी सगळी अभ्यासाची बैठक या कादंबरीमध्ये आहे. मातंगांच्या तीन पिढ्यांच्या संघर्षाचा वेध या कादंबरीत प्रभावीपणे घेतला आहे... या कादंबरीचं मराठीमध्ये फार चांगलं स्वागत होईल, हे निश्चित...'' असे मत प्रा. रा. रं. बोराडे यांनी बाबाराव मुसळे यांच्या वारुळ या नव्या कादंबरीच्या प्रकाशनाच्या वेळी औरंगाबाद येथे व्यक्त केले. साकेत प्रकाशनने ही कादंबरी प्रकाशित केली आहे.

## * आठ हजार दुर्मिळ ग्रंथांची देणगी

'अनेकांचा समज असतो की माणसे ही ग्रंथांसारखी असतात. परंतु पुस्तकेच माणसांसारखी असतात, असे मी मानतो. पुस्तके माणसांची जागा घेऊ शकतात. पुस्तकांची सोबत फार सुरक्षित असते. पुस्तकांशी मैत्री आपल्या स्वातंत्र्याच्या आड येत नाही. माणसे भांडतात, कावतात, दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करतात, मते लादतात. पुस्तकांचे तसे नाही. ग्रंथांशी मी मैत्री केली आणि तिचा मला कधीही पश्चाताप झाला नाही. मला अनेकविध स्वभाववैशिष्ट्यांचे ग्रंथ भेटले. त्यातल्या काहींनी अस्वस्थ केले... ग्रंथ माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनून गेले,' असे ग्रंथांबाबत ग्रंथ-संग्राहक व ज्येष्ठ पत्रकार डॉ. अरुण टिकेकर यांना वाटते. त्यांनी आपल्या ग्रंथसंपदेपैकी- आठ हजार ग्रंथ मुंबई विद्यापीठाच्या राजाबाई क्लॉक टॉवर येथील ग्रंथालयास देणगी म्हणून दिले. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय खोले यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न झाला.

या वेळी डॉ. टिकेकर यांनी 'द रोमान्स ऑफ बुक कलेक्टिंग' या विषयावर बोलताना या विद्यापीठाच्या ग्रंथालयाला ग्रंथदेणगी देण्यामागची आपली भूमिका



सांगितली. ''अमेरिकन साहित्यिक मार्क ट्वेनबाबतची एक आख्यायिका आहे. मार्क ट्वेनच्या घरी त्याचा एक मित्र आला होता. ट्वेनच्या घरी सर्वत्र पुस्तके अस्ताव्यस्त पसरलेली होती- पलंगावर, टीपॉयवर, खुर्च्यांवर सर्व पुस्तकेच पुस्तके. त्या मित्राने विचारले की, तू पुस्तकं नीट बुकशेल्फवर का नाही ठेवत? ट्वेन म्हणाला, 'अरे, तू पुस्तकं उसनी घेऊ शकतोस, पण बुकशेल्फ नाही!' ही गोष्ट ऐकल्यापासून मलाही माझ्या घरी येणाऱ्या प्रत्येकामध्ये 'मार्क ट्वेन' दिसू लागला. यातला विनोद अलाहिदा, पण विद्यार्थीदशेपासून जमवता जमवता माझ्या घरी आता पुस्तकेच पुस्तके झाली आहेत. शिवाय माझ्याकडच्या ग्रंथांपैकी काही आता दुर्मिळ झाले आहेत. ते अभ्यासकांना उपलब्ध होणे मुश्कील झाले आहे. मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयाने आजपर्यंत मला सुखेनैव संचार करू दिला, ग्रंथपालांच्या तीन पिढ्यांनी मला कधीही पुस्तकाविना विन्मुख पाठवले नाही, अशा समृद्ध ग्रंथालयात माझ्या खाजगी ग्रंथ-संग्रहाला जागा मिळावी आणि माझ्या दुर्मिळ ग्रंथांचा लाभ सर्व अभ्यासकांना मिळावा, यासाठी मी हा संग्रह या ग्रंथालयाकडे सुपूर्द करत आहे.''

ग्रंथ जमा करण्याचा छंद कसा अवीट असतो, तो जोपासताना काय यातना भोगाव्या लागतात, वणवण फिरत ग्रंथ मिळवला की त्या आनंदाचा कैफ काय असतो, दुर्मिळ ग्रंथ हाताशी लागला की त्याची नशा कशी और असते... अशा या छंदाबाबतच्या अनेक मनोवस्थांचे वर्णन डॉ. टिकेकर यांनी आपल्या भाषणात केले. जे. एन. टाटांच्या जीवनावर हॅरिस यांनी लिहिलेल्या व जे. आर. डी. टाटांनी गोविंद वल्लभपंतांना भेट दिलेल्या लेदर बाऊंड ग्रंथाची प्रत दिल्लीच्या रस्त्यावर १० रुपयांना अवचित मिळाली, करसनदास मुळजी या समाजसुधारकाने लिहिलेले व दादाभाई नौरोजींनी भेट म्हणून दिलेले पुस्तक हाती लागले असे अनेक किस्से डॉ. टिकेकर यांनी ऐकवले.

'अलीकडे कुणाला वाचायला नको' ही सार्वत्रिक तक्रार आजची नाही, ती पिढ्यान्‌पिढ्यांपासूनची आहे, हे सांगताना डॉ. टिकेकर यांनी काही जुने दाखले दिले. प्रिन्स चार्लस् यांचीही तक्रार होती की, ब्रिटिश वाचक शेक्सपीअरसुद्धा वाचत नाहीत! १८९६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'वाचन' या शंकर वावीकरलिखित पुस्तकाच्या प्रस्तावनेत एक वाक्य आहे- 'आजकाल प्राध्यापक व शिक्षक क्रमिक पुस्तकांबाहेरचे काही वाचत नाहीत.'

डॉ. टिकेकर यांनी विद्यापीठ ग्रंथालयाकडे सोपवलेल्या दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शनही ग्रंथालय इमारतीत भरविण्यात आले होते. डॉ. विजय खोले यांनी अध्यक्षीय भाषणात 'डॉ टिकेकर यांनी त्यांची ग्रंथसंपदा आमच्याकडे सुपूर्द करण्याची इच्छा व्यक्त करण्यासाठी लिहिलेले पत्रही एखाद्या कवितेसारखे मनस्वी आहे. त्यांचे ग्रंथप्रेम व ग्रंथ जतनाबद्दलची हळुवार आस्था त्यातून व्यक्त होते. ही संपदा

आम्हीही तितक्याच आपुलकीने जतन करू,' असे आश्वासन दिले. मुख्य ग्रंथपाल प्रा. विजया राजहंस यांनी टिकेकर यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली.

*** व्यंकटेश माडगूळकर प्रतिष्ठानचा शुभारंभ**

'सिम्बायोसिस'चे डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी प्रतिष्ठानचे उद्घाटन ५ एप्रिल रोजी केले. द. मा. मिरासदार प्रमुख पाहुणे होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष सु. वा. जोशी यांनी स्वागत केले. विश्वस्त ज्ञानदा नाईक यांनी प्रास्ताविक केले.माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसे'मधील कोंडिबा गायकवाड 'आकाशवाणी'तील त्यांचे एक सहकारी, अभिनेते जयराम कुलकर्णी यांनी सादर केला. याच काळात तात्यांनी लिहिलेले 'वाटसरू'हे नभोनाट्य विनय आपटे व स्मिता तळवलकर यांनी सादर केले. 'पती गेले ग काठेवाडी'मधील गाणे कीर्ती शिलेदार यांनी व 'बिकट वाट वहिवाट'मधील प्रसंग श्रीकांत मोघे व स्मिता ओक यांनी रंगवला. मोहन माडगूळकर व अनंत कान्हो यांनीही अभिवाचन केले, तर चित्रकार सुभाष अवचट यांनी त्यांच्या रंगरेषा लेखनातही कशा व्यक्त होतात, ते सांगितले.

'बिनबियांचे झाड' या नाटकात भूमिका करणारे ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांनी तात्यांची माहिती त्यांच्यासारखेच बोलीचे आघात घेत नेमक्या शब्दांत मांडली, ''तात्या दुनियाभर हिंडला, पण दुष्काळी माणदेशातल्या तरवडाच्या झुडपाला आणि त्याच्या पिवळ्याधम्म फुलांना विसरला नाही. पिवळ्या फुलांवर प्रेम करणारा एक व्हॅन गॉग आणि दुसरा तात्या. दहावीपर्यंतही शिकला नाही तात्या, पण त्याची बुकं विद्यापीठांनी शिकवायला लावली. दोन विद्यापीठांनी डी. लिट्. दिली. येडी का खुळी म्हणायची! तात्यानं पंधरा-सोळा वर्षांचा असताना बेचाळीसच्या लढ्यात जेजुरीचा देव लुटताना पोलिसांवर नजर ठेवायची कामगिरी बजावली होती, पण कधी स्वत:भोवती काड्या ओवाळून घेतल्या नाहीत.''

*** हिंसाचार, अश्लीलता टाळा : नारायण मूर्ती**

हिंदी चित्रपटांमधील वाढता हिंसाचार आणि अश्लील दृश्यांमुळेच भारतातील मनोरंजन उद्योग जागतिक दर्जाची उंची गाठू शकलेला नाही; त्यामुळे या हिंसाचाराला व अश्लीलतेला आळा घाला, असा परखड सल्ला 'इन्फोसिस'चे अध्यक्ष एन. नारायण मूर्ती यांनी दिला.

निर्माते-दिग्दर्शकांनी आपली कार्यप्रणाली सुधारल्यास नजीकच्या काळात मनोरंजन उद्योगाची उलाढाल दोन हजार कोटींपर्यंत गेल्यास मला आश्चर्य वाटणार नाही, असेही मत त्यांनी मांडले.

'फिक्की'ने मुंबईत आयोजित केलेल्या मनोरंजन उद्योगावरील अधिवेशनाच्या समारोपात 'द इंडियन आयटी सक्सेस स्टोरी : लेसन्स फॉर द एन्टरटेन्मेंट इंडस्ट्री' या विषयावर ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक यश चोप्रा, पाकिस्तानमधील 'जंग' वृत्तपत्रसमूहाचे अध्यक्ष शकील उर



रहमान अन्सारी उपस्थित होते.

मूर्ती यांनी भाषणाच्या प्रारंभीच मनोरंजन उद्योगाचे माहिती आणि तंत्रज्ञान उद्योगाशी साधर्म्य असल्याचे सांगितले. ते म्हणाले, ''जागतिकीकरणाच्या तत्त्वांचे काटेकोर पालन केल्यामुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचा विकास झाला. मनोरंजन उद्योगालाही आता या तत्त्वांचे पालन करावे लागणार आहे. जागतिक पातळीवर आपली कलाकृती नेण्यासाठी येथील निर्मात्यांनी जगभरातील प्रेक्षकांना समजेल, आवडेल अशा विषयांची निवड करावी. रिचर्ड ॲटनबरोसारखा दिग्दर्शक भारतात येऊन 'गांधी'सारखी श्रेष्ठ दर्जाची कलाकृती निर्माण करू शकतो, तेव्हा आपल्याकडील दिग्दर्शकांनी जॉन केनेडी; तसेच रोनाल्ड रेगन यांच्यावर चित्रपटनिर्मिती का करू नये? जागतिक दर्जाचे कथानक तसेच इतिहासावर अधिक लक्ष केंद्रित केल्यास आपले जागतिकीकरणाचे लक्ष्य साध्य होईल. विदेशातील कलाकारांचे सहकार्य घेऊनही आपण चित्रपटनिर्मिती करायला हरकत नाही.''

हिंदी चित्रपटांना जागतिक पातळीवर नेण्यासाठी मनोरंजन क्षेत्राने 'कॉर्पोरेटायझेशन'चा मंत्र अनुसरायला हवा, असा आग्रह धरीत मूर्ती म्हणाले, ''निर्माते-दिग्दर्शकांनी आपल्या संस्थंच्या कार्यप्रणालीत मोठ्या सुधारणा करणे आवश्यक आहे. प्रत्येक निर्मात्याने पुढील १५ वर्षातील योजनांची आखणी करायला हवी. या क्षेत्राच्या विकासात प्रशिक्षणाचा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. भारतासारख्या मोठी लोकसंख्या असलेल्या देशात अभिनयाचे प्रशिक्षण देणारी अवघी एकच संस्था आहे. पुण्यातील 'एफटीआयआय'प्रमाणे देशात आता आणखीही काही नवीन संस्था सुरू करणे आवश्यक आहे. या संस्थांत निर्मात्यांनाही प्रशिक्षण देणारे अभ्यासक्रम असावेत. उत्तम निर्मिती संस्था म्हणून ज्या निर्मात्यांना नाव कमवायचे आहे, त्यांनी प्रकल्प व्यवस्थापनाचे तंत्र अंगीकारायला हवे. 'कार्पोरेटायझेशन'साठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूकदारांना आकर्षित करणे आवश्यक आहे. हिंदी चित्रपटांच्या कथानकांबाबत प्रेक्षकांकडून कायमच नाराजीचा सूर ऐकायला मिळतो. हिंसाचार; तसेच अश्लीलतेचा तरुण पिढीवर विपरीत परिणाम होतो. तेव्हा आपल्या संस्कृतीला धक्का बसेल, अशा चित्रपटांची निर्मिती निर्मात्यांनी करू नये.''

*** इंग्रजी पुस्तकांच्याच खरेदीची सक्ती नाही**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत फक्त इंग्रजी पुस्तकेच खरेदी करण्याची कोणतीही सक्ती शाळांवर नाही, असा खुलासा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाला पाठवलेल्या पत्रात केला आहे.

राज्य शासनाने सर्व शिक्षा अभियानांतर्गत राज्यातील ऐंशी हजार शाळांसाठी अठरा कोटी रुपये अनुदान दिले होते. या अनुदानातून शाळांनी विद्यार्थ्यांच्या पुरवणी वाचनासाठी पुस्तकांची, तसेच अन्य उपयुक्त वस्तूंची खरेदी करणे

अपेक्षित होते. मात्र, ही पुस्तक खरेदी फक्त इंग्रजी भाषेतील पुस्तकांचीच करणे आवश्यक आहे, असे भासवण्यात आले होते. त्यावर प्रकाशक संघाने आक्षेप घेतला होता. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचीही भेट घेऊन प्रकाशकांनी गाऱ्हाणे मांडले होते. त्यानंतर राज्य प्रकल्प संचालकांनी संघटनेकडे पाठवलेल्या खुलाशात 'शाळांना देण्यात येणाऱ्या शाळा अनुदानातून इंग्रजी किंवा मराठी भाषेतील पुस्तके खरेदी करण्याचे स्वातंत्र्य शाळांनाच आहे,' असे स्पष्ट म्हटले आहे.

### * फुलेवाडा स्मारकाला न्याय

''महात्मा जोतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या वास्तव्याने पुनित झालेला पुणे येथील फुलेवाडा राज्य सरकारसाठी श्रद्धास्थान असून, या स्मारकाला शासनाकडून न्याय दिला जाईल,'' अशी ग्वाही मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी दिली.

बांधकाममंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली महात्मा फुले समता परिषदेच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन या राज्य संरक्षित स्मारकाच्या संदर्भात चर्चा केली. चर्चेत आमदार बाळासाहेब शिवरकर, आमदार कमल ढोले-पाटील, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव ना. बा. पाटील, पुणे महापालिकेचे आयुक्त डॉ. नितीन करीर, पुरातत्त्व विभागाचे संचालक परिषदेचे कार्याध्यक्ष कृष्णकांत कुदळे, अरविंद जमदाडे, राजू घाटोळे, धनंजय सोनसळे, योगेश पिंगळे, दादा शिंदे, प्रज्वल रासकर आदी सहभागी झाले होते.

### * सूक्ष्माक्षरात संपूर्ण गीतरामायण

'गीतरामायणा'वर रसिकांनी भरभरून प्रेम केले. अशाच रसिकांचा एक प्रतिनिधी असलेले रामचंद्र गणेश ऊर्फ भाऊ आपटे यांनी सूक्ष्माक्षरात संपूर्ण गीतरामायण लिहून काढले. एक इंच रुंद व दीड इंच लांब अशा ११२ पानांत ५६ गाणी लिहिली आहेत.

श्री. आपटे त्यावेळी सांगलीत होते. 'संथ वाहते कृष्णामाई' या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू होते. ग. दि. माडगूळकर तेथे गेले होते. त्यांना ही छोटी पोथी त्यांनी दाखवली. ते खूष झाले. त्यांनी पुण्यात परतल्यावर पत्र पाठवून श्री. आपटे यांचे कौतुक केले. ही शुद्ध व कौशल्यपूर्ण प्रत पाहताना श्री. आपटे यांची चिकाटी व कौशल्य यांचे आपल्यालाही कौतुक वाटते. पुणे येथील 'पु. ना. गाडगीळ' पेढीवर श्री. आपटे काम करतात.

### * जर्मन युवती 'गीतरामायण' गाती!

ज्येष्ठ आयुर्वेदाचार्य डॉ. श्रीबालाजी तांबे यांच्या जर्मन शिष्या उला साखर्स, बार्बरा नोल्ट, सिगी ऱ्हील, याना मारिया आणि नीरदा ग्वायमन या स्वीस



शिष्येने 'जय गंगे जय भागीरथी' हे गीत सादर केले.

या शिष्या डॉ. तांबे यांच्या कार्ला येथील 'आत्मसंतुलन व्हिलेज'मध्ये गेली काही वर्षे वास्तव्यास आहेत, अथर्वशीर्ष, रामरक्षा, विष्णुसहस्रनाम यांच्या पठणामुळे संस्कृत शब्दोच्चारांचा सराव आहे; तसेच गीतरामायणातील गीतेही आम्ही अनेकदा ऐकलेली आहेत. यातील गीते म्हणणे हा आमच्यासाठी वेगळा अनुभव आहे,'' अशी भावना नीरदा ग्वायमन यांनी व्यक्त केली. ग्वायमन यांनी झुरिच विद्यापीठातून संगीताचा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. उला साखर्स यांनीही म्युनिक विद्यापीठातून संगीताचे शिक्षण घेतले असून, याना मारिया या पियानोवादक आहेत.

कमला भागवत यांनी १९६९ च्या सुमारास 'गीतरामायणा'चा बंगाली अनुवाद करण्यास प्रारंभ केला. १९७३ मध्ये तो प्रसिद्ध झाला. 'गीतरामायणा'च्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात स्वत: कमला भागवत व सुजाता मोघे यांनी बंगाली गीतरामायण सादर केले होते.

गुजरातीतील गीते संगीता राहुरकर व कुमुद भागवत यांनी सादर केली वीरेन मिश्रा (हिंदी), माधुरी करमरकर (संस्कृत), उपेंद्र भट (कन्नड, कोकणी), श्री. रामाचारी (तेलुगू) यांचाही सहभाग होता.

### * 'यापुढेही समानतेची लढाई लढावीच लागेल'

''जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत श्रीमंतांना अधिक श्रीमंत होण्याची संधी मिळवून दिली जात असल्याने यापुढेही सर्वसामान्यांसाठी समानतेची लढाई लढावीच लागणार आहे. त्यामुळे पक्ष व सत्ता या संदर्भात समाजवाद्यांनी एकत्र येऊन पक्ष स्थापन करणे, ही काळाची गरज आहे,'' असे ज्येष्ठ पत्रकार प्रभास जोशी यांनी सांगितले.

एस. एम. जोशी जन्मशताब्दी समितीच्या वतीने प्रकाश बाळ संपादित 'एकविसाव्या शतकातील लोकशाही समाजवादी विचार' या ग्रंथाचे प्रकाशन त्यांनी केले. समितीचे अध्यक्ष भाई वैद्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

देशभरात झालेल्या निवडणुकीत 'मंडल' व 'कमंडल' या दोघांचाही पराभव झाला आहे. यापुढचे राजकारण 'भूमंडळा'चे असेल, असे सांगून श्री. जोशी म्हणाले, ''आदिवासी, शेतमजूर, छोटे शेतकरी यांच्यामुळे आपल्या प्रगतीला खीळ बसते, असे श्रीमंतांचे मत आहे. मध्यमवर्गीयही आता गरिबांऐवजी श्रीमंतांकडे नजर लावून आहेत. गांधीजी देशातील गरिबांसाठी स्वातंत्र्य आणू पाहत होते. तेच सूत्र समोर ठेवून, असमानतेची तत्त्वे दिसणार नाहीत, यासाठी आपणास लढा द्यावा लागेल.''

उद्योगपती अंबानी यांना त्यांच्या एका उद्योगामधून वार्षिक नऊ कोटी रुपये वेतन मिळते आणि कालाहंडीतील शेतकऱ्याला वर्षभर कष्ट केल्यानंतर

जेमतेम तीन हजार रुपये मिळतात. ही इतकी विषमता का वाढते आहे, असा प्रश्न त्यांनी विचारला. जागतिकीकरणाने जग हे 'ग्लोबल व्हिलेज' बनत असल्याचे सांगितले जाते; पण गाव म्हणजे जैविक समाज असतो. येथील प्रत्येकाचा दुसऱ्याशी संबंध असतो. जागतिकीकरण हे समाज घडविण्यासाठी नव्हे, तर बाजारपेठेचे ग्राहक बनविण्यासाठी होताना दिसते. येथे माणसाचे नाते विचारात घेतले जात नाही, याची जाणीव त्यांनी करून दिली.

श्री. वैद्य म्हणाले, ''जागतिकीकरणाच्या विरोधात कृषिक्षेत्र हेच कुरुक्षेत्र बनणार आहे. शेतीचे यांत्रिकीकरण होऊ घातले आहे. यात शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनी गमवाव्या लागणार आहेत. त्यामुळे वेळीच सावध होऊन सर्व परिवर्तनवादी शक्तींनी एकत्र लढायला सिद्ध व्हायला हवे.''

### * पृथ्वी थिएटरचे योगदान

'पृथ्वी थिएटर' आणि कपूर कुटुंबाशिवाय रंगभूमीचा विचार करणं अशक्य आहे. 'पृथ्वी'विषयीचं पुस्तक वाचताना मला सारखं जाणवतं होतं, की आपण रंगभूमीची मजा नाही अनुभवली. तेथील अभिनयातील उत्कटता, कलाकारांचं घट्ट नातं अनुभवता आलं नाही, याचं मला दुःख आहे...'' एके काळी सिनेसृष्टी गाजविलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री शर्मिला टागोर यांनी रंगभूमीविषयीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या.

शशी कपूर आणि दीपा गेहलोत यांनी लिहिलेल्या 'पृथ्वीवालाज्' या पुस्तकाचं त्यांच्या हस्ते वितरण झाले. त्या म्हणाल्या, ''पृथ्वीराज कपूर यांना सतार वाजविताना पाहिल्याचं मला चांगलं आठवतं. त्यांचा 'मुगले आझम' मी पाहिलाय. 'पृथ्वी'च्या माध्यमातून कपूर कुटुंबीयांनी रंगभूमीवर केलेल्या प्रयोगांचा परिसस्पर्श अनेकांना झालाय. समुद्राशिवाय जशी मुंबई असू शकत नाही, तशीच कपूर कुटुंबाशिवाय रंगभूमीची कल्पना करता येणार नाही. 'पृथ्वी'वालाज्' वाचताना त्या प्रेरणादायी प्रवासाचा अनुभव येतो.

लहानपणी ऐकलेल्या, अनुभवलेल्या गोष्टी सर्वांपर्यंत पोचाव्यात, हा पुस्तकामागील हेतू होता, असं शशी कपूर म्हणाले, पुस्तक वितरणाचे आयोजक 'अल्फा लाव्हल'चे सरव्यवस्थापक सतीश टंडन यांनीही मनोगत व्यक्त केलं.

### * स्वाभिमान बाळगा पण; अहंकाराचा त्याग कराः डॉ. सरदेसाई

''स्वाभिमान जरूर बाळगा; पण अहंकाराचा त्याग करा. बहुतेक आजारांचे मूळ अहंकारात असते. केवळ निकोप, निरामय प्रकृती म्हणजे स्वास्थ्य नव्हे; तर सामाजिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक सुस्थिती महत्त्वाची आहे,'' याकडे ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी लक्ष वेधले.

'श्वसन व प्राणायाम' आणि 'औषधाविना आरोग्य' या दोन ध्वनिफितींचे प्रकाशन प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या हस्ते १२ एप्रिलला झाले.



अस्तित्व, अस्मिता व अभिमान हे स्वास्थ्याचे तीन घटक आहेत. ''स्वतःची ओळख, आपल्या गुणांची जाणीव व त्याविषयीचा रास्त अभिमान असायला हवा. दुसऱ्याविषयी आदर हवा. दुसऱ्याचा दुःस्वास करणारा अहंकाराचा वारा शिवू नये. अहंकार दुखावला की शरीरात रासायनिक प्रक्रिया वेगाने सुरू होतात आणि त्यातून निर्माण होणारी दूषितके आजाराला निमंत्रण देतात. ध्यानस्थ स्थितीत अस्मिता जाणा व अस्तित्व ओळखा, म्हणजे दुःखमुक्त होऊ शकाल.''

शरीरप्रकृती चांगली ठेवण्यासाठी सकस व चौरस आहार, अंतर्बाह्य स्वच्छता, व्यायामातील सातत्य, शरीरातील बदलांची दखल आणि आजाराचा प्रतिबंध या मूलभूत नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. बुद्धी व मनाची सांगड घालणे म्हणजे योग होय. बुद्धी व आत्म्याची सांगड घालायला हवी. तर आत्मा व ब्रह्मचैतन्य यांची एकत्र येण्याची अनुभूती ही अंतिम पायरी होय. भौतिक शरीराबरोबरच तरल शरीर, अवकाश शरीर, अध्यात्म शरीर, विश्व शरीर आणि निर्वाण काया अशी रूपे असतात. या सर्वांत चैतन्य जागविण्याचे कार्य प्राणायाम करतो, असेही त्यांनी सांगितले.

'विज्ञानयुगात जीवनाविषयीचे चिंतन मांडणारा आणि शांतरसाचा उत्कट आविष्कार असलेला देवमाणूस म्हणजे डॉ. सरदेसाई' असे सांगून प्राचार्य भोसले म्हणाले, ''जीवन पारदर्शी, प्रवाही असावे, आनंददायी जीवन निर्माण व्हावे, व्यक्तिगत आग्रह असू नयेत, दुसऱ्यांविषयी आदर हे विचार अनुभवता येतात, त्यामुळे त्यांचे महत्त्व आधिक आहे.'' मोबाईल फोन हे खूप उपयुक्त साधन असले, तरी ते कुणाच्याही सहज हातात पडता कामा नये. त्यामुळे जवळच्या माणसांशी प्रत्यक्ष संवाद तुटला असून वायफळ बडबडीसाठी त्याचा अधिक वापर होत आहे. त्यामुळे समाजस्वास्थ्यासाठी रिव्हॉल्व्हरप्रमाणे मोबाईललाही परवाना असायला हवा, असे मत त्यांनी व्यक्त केले.

'सकाळ'च्या सरव्यवस्थापिका विजया पाटील यांनी प्रास्ताविक केले.

### * 'वऱ्हाड म्हणजे रसिकांसाठी आनंदयात्राच'

'वऱ्हाड निघालंय लंडनला' हा एकपात्री प्रयोग यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. 'वऱ्हाड' हा एक चमत्कार आहे, असे म्हणतात; पण 'वऱ्हाड'कार प्रा. डॉ. लक्ष्मण देशपांडे यांच्या मते, 'वऱ्हाड म्हणजे रसिकांसाठी एक आनंदयात्राच आहे.' आजकाल भारतीय माणसाचा जगाशी संपर्क वाढला आहे, पण भारतीय कुटुंबाचे परदेशाशी नाते जोडण्याचा विचार 'वऱ्हाड'ने पंचवीस वर्षांपूर्वीच दिला, असेही त्यांनी म्हटले.

''एक छोटेसे बीज एकाच माणसाने फुलवावे. त्यातील व्यक्तिरेखांची प्रत्येक माणसाशी नाळ जोडली जावी. मराठवाड्यातील संस्कृती त्यातून उभी राहावी आणि प्रत्यक्ष संस्कृतीत अनेक बदल, स्थित्यंतरे होऊनही 'वऱ्हाड'मधील मांडणी

लोकांना आवडावी, हा एक चमत्कारच आहे. पहिला प्रयोग १९७६ मध्ये मी विद्यार्थ्यांसमोर केला. जेमतेम पंधरा-वीस मिनिटांत मी काही व्यक्तिरेखांच्या मदतीने कथानकाची मांडणी केली. त्या वेळी प्रसिद्धिमाध्यमांचा बोलबाला नव्हता, पण विद्यार्थ्यांनी चोवीस तासांच्या आत 'ते वऱ्हाड फारच भन्नाट आहे' असा प्रचार करून टाकला. नंतरच्या काळात 'वऱ्हाड' बदलत गेले. प्रसंग वाढत गेले. व्यक्तिरेखा वाढल्या. संवाद शैलीत अधिक विनोद, सखोलता येत गेली.''

## * रामूभय्या दाते जन्मशताब्दी

''एखादी गोष्ट कोऱ्या मनाने, सर्जनशीलपणे ऐकणे खूप अवघड असते. रामूभय्यांचे गाणे ऐकणे हे तसे होते. त्यांना ते जमत होते, कारण 'जगणे म्हणजे उधळीत जाणे हृदयातील आनंद' हेच रामूभय्यांच्या जगण्याचे आणि ऐकण्याचे सूत्र होते,'' अशा शब्दांत ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांनी रसिकाग्रणी रामूभय्या दाते यांच्या रसिकतेचा गौरव केला. ३ एप्रिल रोजी रामूभय्या दाते जन्मशताब्दी कार्यक्रम साजरा झाला. 'रामूभय्या दाते एक आनंदप्रवाह' या पुस्तकाचे या वेळी ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या पुस्तकात रामूभय्यांचे पुत्र रवी दाते यांनी सांगितलेल्या आठवणींचे ज्योती दातेकृत शब्दांकन आहे. उत्कर्ष प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

श्री. पाडगावकर म्हणाले, ''गायकांच्या प्रतिभेचे कौतुक होणे मला नवीन नाही, पण जो कधीही गायला नाही, त्याच्या गाणे ऐकण्याचे कौतुक होणे ही आश्चर्याची गोष्ट आहे. रामूभय्यांच्या या ऐकण्याचे का कौतुक झाले असावे याचा मी विचार केला. आपण जे काही ऐकतो, ते संस्कारबद्ध आणि बऱ्याच वेळा पूर्वग्रहदूषित मनाने ऐकतो. रामूभय्यांचे ऐकणे आपल्यासारखे नव्हते. हे संस्कार बाजूला सारून प्रत्येक वेळी ते कोऱ्या मनाने ऐकत असत. गायकाचे घराणे, शैली याची कधीही तुलना न करता त्या वेळी येणारा अनुभव ते घेत असत. तो आध्यात्मिक अनुभव होता.''

''रामूभय्या हे केवळ गाण्यावरच नव्हे, तर साहित्यावर, जीवनातील मांगल्यावर, सद्गुणांवर प्रेम करणारे होते,'' असे डॉ. लागू यांनी सांगितले.

''अनेक कलाकार केवळ बाबांची दाद घ्यायला येत असत. अशा रसिकाचा मी मुलगा आहे, हे मी मला मिळालेले सर्वांत मोठे पारितोषिक समजतो,'' अशी भावना अरुण दाते यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ साहित्यिक श्री. ना. पेंडसे, विंदा करंदीकर, पु. ल. देशपांडे, पं. भीमसेन जोशी, वसंत साठे यांनी रामूभय्यांबद्दल सांगितलेल्या आठवणी ध्वनिचित्रफितीद्वारे दाखवण्यात आल्या.

## * डॉ. आंबेडकरांना एका जातीत बंदिस्त करणे चुकीचे

''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना एका जातीपुरत्या मर्यादित ठेवणाऱ्यांना यापुढे शत्रू मानायला हवे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांना मर्यादा घालण्याचा नादानपणा



काही नेते करीत असतील मात्र त्यांना टाळून पुढे जाण्याची गरज आहे,'' असे मत माजी आमदार लक्ष्मण माने यांनी पुणे येथे व्यक्त केले.

फुले शाहू आंबेडकर प्रतिष्ठानतर्फे आयोजित परिसंवादात ते बोलत होते. ॲड. जयदेव गायकवाड परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होते.

श्री. माने म्हणाले, ''डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य, आदिवासी, भटक्यांना सन्मानाने जगण्याची संधी मिळवून दिली. या समाजांत परिवर्तन झाले. मात्र त्यांच्यातील अंतर्गत भांडणे कमी झाली नाहीत. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारला. त्यांच्यासमवेत केवळ महार समाज गेला. त्यामुळे बौद्ध धर्म व डॉ. आंबेडकर केवळ याच समाजाचे आहेत, असा भ्रम जोपासला जात आहे. हा भ्रम मी बौद्ध धर्म स्वीकारून तोडणार आहे. खरे तर सर्वच दीनदलितांनी ब्राह्मण्यवाद झुगारून तथागतांच्या मार्गाने यायला हवे. त्याशिवाय त्यांची सत्ता येणार नाही.''

श्री. रामनाथ चव्हाण म्हणाले,''समाज पुरोगामी बनण्यासाठी परंपरांची मोडतोड करायला हवी. जातींचा दुराभिमान आजही जात नाही. त्यासाठी या पिढीने काहीच केले नाही. आंतरजातीय विवाह मंडळे स्थापन करण्यासाठी आता पुरोगाम्यांनी पुढाकार घ्यायला हवा. दलितांनी सत्ता संपादन केल्याशिवाय डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा भारत निर्माण होणार नाही. त्यासाठी राजकारण करणेही गरजेचे आहे.''

## * सामाजिक समतेचे काम आता युवकांवर

''स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण राजकीय समता स्वीकारली; पण सामाजिक आणि आर्थिक समता साधण्यात आमची पिढी अयशस्वी ठरली,'' अशी खंत व्यक्त करून ही समता साधण्याचे काम युवा पिढीने करावे, असे आवाहन ज्येष्ठ विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान यांनी केले.

महात्मा गांधी यांनी काढलेल्या दांडी यात्रेच्या अमृतमहोत्सवानिमित्त महाराष्ट्र गांधी स्मारक निधीच्या वतीने दोन दिवसांचे 'गांधी विचार प्रबोधन शिबिर' आयोजित करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन प्रा. प्रधान यांनी केले. चंद्रशेखर धर्माधिकारी प्रमुख पाहुणे होते. गांधी स्मारक निधीचे राष्ट्रीय सचिव रामचंद्र राही, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे सदस्य सचिव रंगनाथ पुंड, विश्वस्त अभय छाजेड, युक्रांदचे डॉ. कुमार सप्तर्षी, प्रा. सुभाष वारे आदी उपस्थित होते.

प्रा. प्रधान म्हणाले, ''महात्मा गांधी यांनी मिठाचा सत्याग्रह केला. त्याचा अर्थ त्या वेळच्या तथाकथित बुद्धिवाद्यांना कळलाच नव्हता. व्हाईसरॉयनेही या सत्याग्रहाची थट्टा केली होती. पण सामान्यांना मात्र या सत्याग्रहाचा अर्थ बरोबर समजला. ब्रिटिश सरकारचे सारे नियमच यापुढे झुगारून लावायचे, हे महात्मा गांधी यांनी समाजाला दाखवून दिले. महात्मा गांधी यांनी १९२० मध्ये बहिष्काराचे आवाहन केले. तेथून 'चले जाव' चळवळीपर्यंत त्यांनी आंदोलनांची एक साखळीच उभारली. त्यांच्या आंदोलनांना ब्रिटिशांनी देशद्रोह संबोधले. पण असा 'देशद्रोह'

हा माझा धर्मच आहे, हे महात्मा गांधी यांनी ठामपणे सांगितले.''

ते पुढे ''म्हणाले, महात्मा गांधी यांच्या जीवनातील दोन यात्रा अतिशय महत्त्वाच्या आहेत. एक दांडी यात्रा आणि दुसरी नौखालीत त्यांनी काढलेली पदयात्रा. दांडी यात्रेत लोकांनी त्यांच्यावर फुले उधळली; पण नौखालीत महात्मा गांधी यांच्याबरोबर कुणीच नव्हते. महात्मा गांधी एकटेच नौखाली भागातल्या दु:खितांचे अश्रू पुसण्यासाठी तेथे जाऊन पोहोचले. ज्या मार्गाने महात्मा गांधी चालले, त्या मार्गाने जाऊन आपणात क्षणिक का होईना, असामान्यत्व प्रकट होईल काय ते पाहिले पाहिजे.''

तुमच्या आमच्या मुलांपर्यंत गांधी कधी पोचविले गेले नाहीत, असे सांगून न्या. धर्माधिकारी म्हणाले, ''आपल्या गरजांवर आता आंतरराष्ट्रीय बाजार जगणार आहे. अशा वेळी महात्मा गांधी यांच्या मूल्यांचा विचार केला पाहिजे. अन्याय, भ्रष्टाचार सहन करायचा ही सवय पडली आहे. भ्रष्टाचाराच्या व्याख्या बदलत आहेत. देशात आपण अनेक प्रसंग साजरे करतो; पण त्यातून जी शक्ती निर्माण करायला पाहिजे ती आपण करू शकत नाही. युवकांना महात्मा गांधी समजावून देऊन अन्याय, भ्रष्टाचार सहन करण्याची ताकद दिली, तरच दांडी यात्रेचा अमृतमहोत्सव खऱ्या अर्थाने साजरा होऊ शकेल.''

### * सुनीता नारायण यांना स्टॉकहोम वॉटर पुरस्कार

'पाणी म्हणजे जीवन' हे जरी खरे असले तरी त्याची टंचाई सर्वांनाच दिवसेंदिवस भेडसावत आहे. पाण्याचे पद्धतशीर वितरण करण्याची योजना आखणाऱ्या नवी दिल्लीतील 'सेंटर फॉर सायन्स अॅन्ड मिडिया, संस्थेच्या प्रमुख श्रीमती सुनीता नारायण यांच्या कार्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली असून यंदाचा स्टॉकहोम वॉटर पुरस्कार त्यांना घोषित झाला आहे. एका भारतीय महिलेला अशा प्रकारचा पुरस्कार मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे.

### * आपण भाषा कशी शिकतो?

स्टीव्हन पिकरचं लँग्वेज अॅक्विझिशन (भाषा-संपादन) हे पुस्तक आपल्या मनात येणाऱ्या भाषा आकलनविषयक प्रश्नांची उत्तरं देणारं आहे. अखिल जीवसृष्टीत मानव हा एकटाच भाषेचा वापर करतो. तसा वापर करायला लागणारी कंठातील स्वरतंतूंची योजना उत्क्रांत होत जाणाऱ्या जीवसृष्टीत या अखेरच्या टप्प्यावर मानवात निर्माण झाली आहे.

पशुपक्षी साद-प्रतिसादाकरिता निरनिराळे आवाज काढू शकतात, पण भाषेचं जे अत्यंत व्यामिश्र स्वरूप मानवाला अवगत झालं आहे ते इतरत्र आढळत नाही. भाषा ही आनुवंशिकतेचीही देणगी आहे. आनुवंशिकता आणि स्वरयंत्रणा या पायावर उभारलेली ही इमारत आपण कशाकरता वापरतो? गरजा सांगण्याकरता, साद-प्रतिसादाकरता, की मनातले विचार मांडण्याकरता? विचारवंत जी भाषा वापरतात, ती फार प्रगल्भ असते. अशी भाषा वापरण्याची गरज सगळ्यांनाच वाटत नाही. तरीही आपल्या भावना, स्मृती, आपल्या प्रतिक्रिया आपण भाषेच्याच माध्यमातून व्यक्त करतो आणि अव्यक्त स्वरूपातही आपला आपल्या मनाशी जो संवाद चालातो, त्याचेही माध्यम भाषा हेच असते.

ही देणगी आपल्याला जन्मजात असते का? लहान मूल हातपाय हलवतं, हसतं-रडतं, दोन महिन्यांनंतर नजर स्थिर करून हुंकार देऊ लागतं. मम, बाबा, बाय, हो, नाही असे थोडे शब्द वर्षाचं मूल बोलू शकतं, पण पुरती भाषा उलगडू लागते ती अठरा महिन्यांनंतर. सतत ऐकत असलेलं मूल, आईने बोबड्या भाषेत वापरलेले शब्द सोडून स्वतंत्रपणे बोलू लागतं. पिकर म्हणतो, की असं बोलण्यापूर्वीच मूल मनात विचार करीत असतं. शब्दांऐवजी रंग, रूप, आकार, नाद व स्पर्श हेच त्यांचे माध्यम असतं.

या कोवळ्या वयात मूल आजूबाजूला वापरल्या जाणाऱ्या दोन अगर तीन भाषाही बोलू लागतं. त्या वेळची त्याची भाषा मातृभाषेसारखी उच्चारविरहित असते. मोठेपणी परभाषा शिकणारा माणूस तशी मूळ भाषा बोलणाऱ्यांसारखी कधीच बोलू शकत नाही. नुसती नामं आणि क्रियापदंच नव्हे; तर संपूर्ण वाक्यरचना, लिंगभेद व विशेषण व क्रियापद यात होणारा बदल, असं भाषेचं सगळं व्याकरण मुलं सहजी उलगडतात. त्यात त्यांची विशिष्ट विचारपद्धती असतेच.

पिकर भाषेविषयी यापेक्षाही खूप खूप काही सांगतो. व्याकरण, बोली भाषा, ज्ञानाची भाषा अशा विविध विषयांवरचं हे पुस्तक वाचत राहावंसं वाटतं.

### * जेम्स लेन यांना सातारा न्यायालयात हजर राहण्याचा आदेश

छत्रपती शिवाजीमहाराज व राजमाता जिजाऊ यांची बदनामी करणारा मजकूर प्रसिद्ध केल्याप्रकरणी जेम्स लेन व अन्य नऊ जणांनी न्यायालयाने जारी केलेल्या समन्स प्रक्रियेविरोधात उच्च न्यायालयात फौजदारी अर्ज दाखल केला आहे, त्यामुळे त्यांचा गैरहजेरीचा अर्ज मंजूर करून मुख्य न्यायदंडाधिकारी आर. एम. पांडे यांनी त्यांना ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली.

'शिवाजी : हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया' या पुस्तकाचे लेखक जेम्स लेन याच्यासह नऊ जणांवर त्यांनी कट करून बदनामी केल्याच्या आरोपावरून छत्रपतींचे तेरावे वंशज उदयनराजे भोसले यांनी सातारा येथील मुख्य न्यायदंडाधिकारी आर. एम. पांडे यांच्याकडे खटला दाखल केला आहे. त्यानुसार न्यायदंडाधिकारी पांडे यांनी प्रथमदर्शनी त्यांना दोषी धरून त्यांना २ एप्रिलला न्यायालयात हजर राहण्याचे समन्स बजावले होते.

जेम्स लेन, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचे भारतातील व्यवस्थापक सईद मझहर खान, पुस्तक विक्रेता श्रीकांत झरकर, भांडारकर संस्थेचे ग्रंथपाल

वा. ल. मंजुळ, श्रीकांत बहुलकर, सुचेता परांजपे, रेखा दामले, यशवंत दामले, भास्कर चंदावरकर यांचा समावेश आहे.

### * लेखन-वाचन प्रकल्प हवाच!

महाराष्ट्र शासनाचा लेखन-वाचन प्रकल्प वादग्रस्त ठरला आहे. सरकार जनतेच्या सोयीसाठी योजना आखते, त्याची अंमलबजावणी करते आणि त्याची फळे समाजाला त्या योजनेच्या फलश्रुतीमधून मिळत राहतात. बऱ्याच वेळा त्या योजनेची उद्दिष्टे साध्य होत नाहीत, असे आढळल्यास त्यांची समीक्षा केली जाते. त्यावर वेगवेगळे उपाय सुचविले जातात. अनेक वेळा त्या योजनेची मूलभूत रचनाही बदलावी लागते.

गेल्या दोन दशकांपासून प्राथमिक शिक्षणाची प्रचंड हेळसांड होऊन उतरोत्तर अधोगतीच झालेली आढळून येते. उदा. इयत्ता पाचवीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला स्वत:चे पूर्ण नाव लिहिता येत नाही, ही वस्तुस्थिती नजरेआड करून चालणार नाही. त्याविषयी अनेक प्रकल्प आणि संशोधन अहवालातून येणारे वृत्तांत अनेक माध्यमांद्वारे समाजापर्यंत वेळोवेळी पोचत आहेत. त्यामुळे शिक्षणाचा विचार करणाऱ्यांना ही वस्तुस्थिती डावलून पुढे जाता येणार नाही.

स्वातंत्र्योत्तर काळानंतर दोन दशकांपर्यंत अल्प वेतनात, अनेक अडचणींना व गैरसोयींना तोंड देऊन ज्या नैतिक व कर्तव्यभावनेच्या बळाने ग्रामीण भागांतील प्राथमिक शिक्षकांनी भावी शिक्षणाचा भक्कम पाया घालण्याची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली, त्यांचे भारतीय समाजावर खऱ्या अर्थाने एक ऋणच आहे. त्यामधून आपणा सर्वांना पुढील पिढ्यांना योग्य शिक्षण देऊन खरेतर उतराई होता आले असते; परंतु गेल्या दोन दशकांतील भौतिक प्रगती व त्याचबरोबर अडचणी व गैरसोयींवर मात करून प्राथमिक शिक्षकांना अनेक सोयी सवलतींचा लाभ मिळवून देऊनही प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ होण्याऐवजी ती खालावत गेल्याचेच आढळून येते. यावरून असे दिसते, की सोयी-सवलतींचा आलेख उंचावत जात असताना कर्तव्यभावनेचे आणि जबाबदारीचे भान मात्र दूर दूर जात आहे.

साक्षरतेचा पायाच प्राथमिक शिक्षणातून घातला जातो. मातृभाषेतून लिहिता आणि वाचता येणे म्हणजे साक्षरता, एवढी साधी-सोपी आणि सुटसुटीत साक्षरतेची व्याख्या आहे. या व्याख्येनुसार लेखन-वाचन हीच भावी शिक्षणाची वाटचाल असल्यामुळे लेखन-वाचनाचे शिक्षणप्रक्रियेत अनन्यसाधारण महत्त्व कोणाही व्यक्तीला नाकारता येणारे नाही; परंतु आजचे प्राथमिक शिक्षक या मूळ संकल्पनेलाच छेद देऊन त्याकडे सोयीस्कररीत्या डोळेझाक करून समाजाची व शासनाची दिशाभूल करीत आहेत, असे वाटते. आपण ज्या समाजातून आलो, त्या समाजातील मुलांसाठी आपण काही केले पाहिजे, त्यांचे आपण सामाजिक ऋण म्हणून काही देणे लागतो, ही उर्मी शिक्षकांमधून कमी होत चालली आहे, असे वाटते.



केवळ लेखन-वाचनाच्या अभावामुळे नुसते प्राथमिकच नाही, तर माध्यमिक व उच्च शिक्षणाचे शिखरही सारखे डळमळते आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी नुसता शिक्षणातच नाही, तर स्पर्धात्मक जगात खूप मागे पडत आहे. प्रचंड बेरोजगारी आणि दर्जाहीन शिक्षणामुळे विद्यार्थी परीक्षेतील कॉपी व अन्य गैरमार्गांचा आधार घेऊन स्वत:तील शैक्षणिक उणीव दूर करण्याचा प्रयत्न करतो. परंतु कॉपीचा प्रभाव हा समाजातील दर्जाहीन शैक्षणिक संस्कृतीचेच दर्शन घडवितो व तो दूर करण्यासाठी सर्वच स्तरांवर त्याला विरोध करण्याची केविलवाणी धडपड चालल्याचे आढळून येते. मात्र, या समस्येचे मूळ लेखन-वाचनाचा अभाव यामध्येच दडले आहे, असे आज जाणवू लागले आहे.

शहरी भागातील गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षणातून शिक्षणालाच पूरक अशी जी ज्ञानाची वृद्धी व ज्ञानाचा प्रभाव प्रचंड वेगाने आज पुढे जाताना दिसतो आहे, त्यापासून केवळ लेखन-वाचनाच्या दुरवस्थेमुळे व अभिरुचीअभावी ग्रामीण भाग वंचित व अनभिज्ञ राहत आहे. त्यासाठी जिल्हा परिषदांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या या प्राथमिक शिक्षणाकडून ही अपेक्षा करून नये का, असाही प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही,

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्याने लेखन-वाचन हमी प्रकल्पाची जी अभिनव योजना हाती घेतली आहे, तिच्या पाठीशी संपूर्ण महाराष्ट्राने उभे राहावे. या निर्णयाची शासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता पूर्ण शक्तीनिशी अंमलबजावणी करावी व त्याला आणखी गती द्यावी, ही अपेक्षा आहे. - **रामनाथ वाघ, पुणे.**

### * पटकथा लेखन कार्यशाळा

ना. ग. करमरकर हे मराठी चित्रपटांचे एक कुशल पटकथाकार होते. त्यांनी पटकथा लिहिलेले अनेक चित्रपट गाजले. बारा वर्षे सहा महिने तीन दिवस, सोनारानं टोचलं कान, धाकटी मेहुणी, गृहदेवता, चिमुकला पाहुणा, बाजीरावचा बेटा हे त्यांचे चित्रपट. त्यांचा इंग्रजी चित्रपटांचा उत्कृष्ट अभ्यास होता. मराठी चित्रपटांचा दर्जा वाढत जावा, लोकांना अभिरुचिसंपन्न करणारी करमणूक असावी, अशी तळमळ त्यांना होती. १ फेब्रुवारी २००३ ला त्यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांच्या आप्तेष्टांनी करमरकर स्मृती प्रतिष्ठानाची स्थापना करून त्याद्वारे मराठी चित्रपट निर्मितीच्या अभ्यासासाठी एक व्यासपीठ निर्माण केले. गेल्या वर्षीचे पटकथालेखन शिबिर मधुकर पाठक आणि श्रीनिवास भणगे यांनी घेतले होते. सुमित्रा भावे आणि सुनील सुकथनकर यांनी यंदा घेतलेली पटकथा लेखन कार्यशाळा अडीच दिवसांची होती. दोघेही तिन्ही दिवस अगदी जेवायच्या वेळीसुद्धा सर्वांबरोबरच होते. निर्दोष पटकथा लेखनासाठी उदाहरणे म्हणून - देवराई आणि इतर चित्रपटातील काही भाग दाखवण्यात आले. पटकथा लेखन, संवादलेखन चित्रपटविषयक तांत्रिक गोष्टी, चित्रपट पाहण्याची दृष्टी, संवाद, स्वागत, फ्लॅशबॅक या बाबींवर

मार्गदर्शन केले गेले. वास्तुपुरुष, दोघी, जिंदगी झिंदाबाद, दहावी फ या सुमित्रा भावेंच्या चित्रपटांतील दृश्यांमधून पटकथालेखन आणि संवादलेखन सोदाहरण समजून दिले गेले. देहबोली, डोके यांच्याद्वारे होणारा नि:शब्द संवाद, एकतर्फी संवाद यासाठी शब्दांचा काळजीपूर्वक आणि जरूर तेवढाच उपयोग याचे हे चित्रपट म्हणजे वस्तुपाठच आहेत. या कार्यशाळेचे संयोजन नारायण गणेश करमरकर स्मृतिप्रतिष्ठानद्वारे केले होते. विद्यासागर आणि सुनंदा महाजन, अजित आणि अमृता सातभाई, गोपाळ करमरकर यांनी कार्यक्रमाचे नेटके संयोजन केले.

### * कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी जब्बार पटेल

प्रतिष्ठानचे तिसरे अध्यक्ष म्हणून दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच विश्वस्तपदी फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांना तर प्रतिष्ठानच्या के. ज. म्हात्रे संदर्भ ग्रंथालयाच्या अध्यक्षपदी लोकेश शेवडे यांना नेमण्यात आले आहे.

रिक्त झालेल्या पदांच्या नियुक्ती बाबतचे अधिकार प्रतिष्ठानचे मावळते अध्यक्ष न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांना देण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी या तिन्ही पदांबाबत शिफारस केली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानासाठी कुसुमाग्रजांवर 'प्रवास पक्षी' हा लघुपट डॉ. पटेल यांनी तयार केला आहे.

### * मायक्रोसॉफ्टचे लक्ष आता भारतीय भाषांकडे

इंग्लिशव्यतिरिक्त इतर भारतीय भाषांमध्ये आयटी ॲप्लिकेशन्स विकसित करण्यासाठी मायक्रोसॉफ्ट कॉर्पोरेशनने भारतातील इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना आवाहन केले आहे. यासाठी त्यांनी इंडिका डेव्हलपमेंट चॅलेंज (आयडीसी) ही काँटेस्टही सुरू केली आहे.

भारतीय भाषांमध्ये काम करू इच्छिणाऱ्या होतकरू डेव्हलपर्सना मायक्रोसॉफ्ट लागेल ती टेक्निकल मदत पुरवणार आहे. यासाठी मुंबई आणि दिल्लीतील आयआयटींच्या टेक्निकल फेस्टिव्हल्समधून या काँटेस्टविषयी माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणार आहे.

भारतात केवळ पाच टक्के जनताच 'इंग्रजी साक्षर' आहे. त्यामुळे कंप्युटरला छोट्या शहरांत आणि खेड्यापाड्यांत पोहोचवण्यात इंग्लिश भाषा म्हणजे मोठा अडसर ठरतो. यासाठी भारतीय भाषांत ॲप्लिकेशन्स विकसित करण्याची कल्पना पुढे आली, असे मायक्रोसॉफ्टचे सिनियर मार्केटिंग मॅनेजर रवीश गुप्ता यांनी सांगितले. मायक्रोसॉफ्टने 'प्रोजेक्ट भाषा' हा प्रकल्प हाती घेतला आहे. भारतीय भाषांमध्ये कंप्युटरचा वापर, ॲप्लिकेशन वाढावे यासाठी सरकार, शिक्षण तज्ज्ञ, उद्योग क्षेत्र, डेव्हलपर्स आदींना प्रोत्साहन देण्याचा 'प्रोजेक्ट भाषा'चा उद्देश आहे. मुंबई आणि दिल्लीतील आयआयटींव्यतिरिक्त बनस्थली आणि म्हैसूर येथील विद्यापीठे, बंगलोरमधील इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स यांच्याशीही मायक्रोसॉफ्टने बोलणी



सुरू केली आहे.

इंडिक डेव्हलपर चॅलेंजला सुरुवातीपासूनच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, १००० विद्यार्थ्यांनी नावे नोंदवली आहेत.

### * गीतरामायण सुवर्ण महोत्सव

''गदिमा गेले...बाबूजी गेले...पण कालचक्र फिरत राहील. 'गीतरामायण' कायम राहील; कारण ते महाकाव्य आहे. मराठी संस्कृतीचे प्रतिबिंब असलेले महाकाव्य आहे,'' अशी भावना माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी व्यक्त केली.

'सकाळ' वृत्तपत्रसमूह आणि गदिमा प्रतिष्ठान आयोजित 'गीतरामायण' सुवर्णमहोत्सवी आनंदसोहळ्याचे उद्घाटन वाजपेयी यांनी केले. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार प्रमुख पाहुणे होते.

वळवाच्या पावसामुळे उद्घाटन सोहळा सुमारे तासभर उशिरा सुरू झाला. वाजपेयी म्हणाले, पंचवीस वर्षांपूर्वी 'गीतरामायण'च्या रौप्यमहोत्सवात मी व शदर पवार सहभागी झाले होतो. त्या वेळी ग. दि. माडगूळकर नव्हते; पण सुधीर फडके होते. आज तेही नाहीत. गदिमा गेले... बाबूजी गेले... पण कालचक्र फिरतच राहील. 'गीतरामायणा'चे पंचवीस वर्षांपूर्वी ऐकलेले सूर अजूनही हृदयात ताजे आहेत. हे महाकाव्य आहे. हा रामकथेचा प्रवाह निरंतर चालू राहील.''

रामकथा हा संस्कृतीचा संगम आहे. भौतिक व आध्यात्मिक यांची सांगड या काव्यात आहे, असे सांगून ते म्हणाले, ''रामकथा सांगणाऱ्या गदिमांच्या शब्दातही आत्मविश्वास आहे. हा आत्मविश्वास केवळ प्रतिभेशी संबंधित नाही, तर कोणती तरी आंतरिक प्रेरणा त्यात आहे. त्यांनी स्वत:च लिहून ठेवले आहे - 'ज्ञानियाचा-तुकयाचा तोच माझा वंश आहे, माझिया रक्तात थोडा ईश्वराचा अंश आहे.' या ईश्वराच्या अंशामुळेच गदिमांच्या हातून 'गीतरामायण' लिहून झाले. ही रामकथा सांगताना त्यांनी रामजन्मापासून सांगितली नाही, तर त्याच्याच लवकुश या मुलांकडून ऐकवली, त्यातील नाट्य महत्त्वाचे आहे. ती कल्पना मोठी गोड आहे.''

रामकथेत आपले आदर्श, शाश्वत सत्ये, आपल्याला आवडणारी तत्त्वे प्रत्येकाने शोधण्याचा प्रयत्न केला, असे सांगून श्री. पवार म्हणाले, ''रामायण व महाभारत या दोन महाकाव्यांनी जनमानसावर राज्य केले. भारताच्या सर्व कानाकोपऱ्यांत ही महाकाव्ये गेलीच; पण देशाबाहेरही अनेक अंगांनी ही महाकाव्ये फुलत राहिली, अभ्यासली गेली. कवी, कीर्तनकार, चित्रकार, चित्रपट निर्माते, दूरचित्रवाणी मालिकांचे निर्माते, अभ्यासक या प्रत्येकालाच ही महाकाव्ये आवाहन करीत राहिली. करीत राहतील; पण मराठीपुरतातरी 'गीतरामायण' हा 'या सम हा' असाच चमत्कार आहे.''

## * 'संत तुकाराम महाराजांची अमृतवाणी सर्व भाषांमध्ये यावी'

देशातील सर्व भाषांमध्ये संत तुकाराम महाराजांची अमृतवाणी अनुवादित झाल्यास त्या त्या भाषिक जनतेला एकसंध बांधण्यास मदत होईल. त्याप्रमाणे सिंधी भाषेत संतांचे अभंग अनुवादित करून लछमण हर्दवाणी यांनी कौतुकास्पद कार्य केले आहे, असे नगरचे आमदार अनिल राठोड यांनी 'संत तुकाराम जी अभंगवाणी' या पुस्तकाचे प्रकाशन करताना सांगितले. या वेळी पुस्तकाची पहिली प्रत तुकोबारायांच्या चरणी अर्पण करण्यात आली.

इंद्रायणी नदीतीरावर ज्या स्थळी तुकोबारायांचे अभंग डोहात बुडवले होते तेथे या सिंधी पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

आमदार राठोड यांनी सांगितले की, पुस्तकाचे लेखक लछमण हर्दवाणी हे संतभक्त आहेत. कोणाचेही फारसे पाठबळ न घेता त्यांनी हे पुस्तक मोफत देण्याचा निर्णय घेतला.

सिंधी लेखक लछमण हर्दवाणी म्हणाले की, "सज्जनगडावर दासबोध ग्रंथाच्या सिंधी भाषेतील अनुवादाचे प्रकाशन झाले. तुकोबारायांच्या १५१ अभंगांचे सिंधी भाषेत निरूपण केलेले आहे. सिंधी साहित्यिक सामी यांच्या साडेचार हजार श्लोकांमध्ये आणि संत तुकोबारायांच्या अभंगामध्ये मला साम्य दिसले."

या वेळी देहू देवस्थानचे विश्वस्त रामभाऊ मोरे, नगर येथील मान्यवर उपस्थित होते. मुख्य मंदिरात या वेळी एक प्रत अर्पण करण्यात आली.

## * ७०० शाळा ग्रंथपालांविना?

सातारा जिल्ह्यातील ७०० माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधल्या पूर्णवेळ आणि अर्धवेळ ग्रंथपालांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळण्याची भीती आहे.

सन २००३ साली कोकण समितीच्या अहवालानुसार ज्या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या दोन हजारहून जास्त आहे, तेथे पूर्णवेळ आणि ज्या ठिकाणी एक हजार विद्यार्थी संख्या आहे तेथे अर्धवेळ ग्रंथपाल ठेवण्यास मान्यता मिळाली होती. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा संघटनेने केलेल्या सर्वेक्षणात फक्त २२ शाळांमध्ये एक हजारच्या पुढे विद्यार्थी संख्या आहे. बाकीच्या शाळांतल्या ग्रंथपालांना काढून टाकणार का, अशी भीती निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील शाळांना १९९७-९८ पासून निधी वेळेवर उपलब्ध झालेला नाही.

एकूण ७०० शाळांपैकी फक्त २०० शाळांमध्येच ग्रंथपाल हे पद आहे. यापैकी १२३ अर्धवेळ आणि ५६ पूर्णवेळ ग्रंथपाल म्हणून आहेत. यापैकी २१ जणांना कोणत्याही स्वरूपात मानधन मिळत नाही. हातात येणारा तुटपुंजा पगारही आता जाणार या भीतीने या ग्रंथपालांची झोप उडाली आहे.



## * माहिती तंत्रज्ञान क्षेत्राने सामाजिक भान ठेवावे

माहिती-तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील कंपन्यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून देशवासीयांचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रकल्प हाती घेणे आवश्यक आहे, असे मत 'झेन्सार टेक्नॉलॉजी'चे व्यवस्थापकीय संचालक गणेश नटराजन यांनी पुणे येथे देवांग मेहता स्मृतिदिनी व्यक्त केले.

दीपक शिकारपूर यांनी लिहिलेल्या 'संगणक आय. टी. डॉट कॉम' या पुस्तकाचे त्यांच्या हस्ते प्रकाशन झाले. ऑस्ट्रेलियातील संगणकतज्ज्ञ रिचर्ड कुलकर्णी, 'कॉम्प्युलिंक'चे विश्वास महाजन, सु. वा. जोशी आदी या वेळी उपस्थित होते.

संगणक, माहिती-तंत्रज्ञानामुळे समाजातील दरी वाढत असून त्यावर वेळीच विचार करणे आवश्यक आहे, असे सांगून नटराजन म्हणाले की, सत्यमसारख्या कंपन्यांनी दक्षिण भारतामधील अकराशे खेड्यांमधील विकासाची जबाबदारी उचलली आहे. झेन्सारने आपल्या उत्पन्नाच्या पाच टक्के रक्कम सामाजिक कार्यासाठी देण्याचे धोरण स्वीकारले आहे. आजमितीस जागतिक बाजारपेठेत भारतीय आयटी क्षेत्राचा हिस्सा केवळ ३ टक्के आहे. तो १५ टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट आहे.

पुण्यामुंबईप्रमाणे इतरही भागाचा समावेश असलेले आयटी धोरण स्वीकारणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा शिकारपूर यांनी व्यक्त केली.

रिचर्ड कुलकर्णी यांनी सांगितले की, भारतीय आयटी तज्ज्ञांसमोर चीनबरोबरच युरोपीय देशांचेही आव्हान आहे. रशिया, चेक प्रजासत्ताक, रोमानिया आदी देशांमध्येही भारताप्रमाणे स्वस्तात आयटी तंत्रज्ञान व तंत्रज्ञ उपलब्ध होत आहेत. त्यामुळेच भारताने संगणककुशल व्यक्तींच्या उलाढालीबरोबरच जागतिक पातळीवरील प्रकल्प राबवणे आवश्यक आहे.

## * नवलेखक अनुदान योजना

नवलेखकांना उत्तेजन मिळावे, यासाठी त्यांच्या कविता, कथा, कादंबरी, नाटक, एकांकिका, बालवाङ्मय, वैचारिक लेख, चरित्र आत्मकथन यांच्या प्रकाशनार्थ 'नवलेखक अनुदान योजना' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने कार्यान्वित केली आहे.

नवलेखकांनी २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी वरील प्रकारातील साहित्य पाठवावे. एकही पुस्तक प्रकाशित न झालेले लेखक या योजनेत अभिप्रेत आहेत. ही योजना महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील फक्त मराठी लेखकांनाच लागू आहे. नवलेखकाला कोणत्याही एका वाङ्मय प्रकारात एकच हस्तलिखित एक एप्रिल ते ३१ मे २००५ या कालावधीत सादर करता येईल.

माहितीपत्र व अर्जासाठी संपर्काचा पत्ता : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला, १७२ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग दादर, मुंबई १४.

## * मराठी चित्रपट न दाखवल्यास थिएटरला टाळे

उत्तम मराठी चित्रपटांच्या निर्मितीस प्रोत्साहन देण्याची सरकारची भूमिका असून, मराठी चित्रपट दाखवण्यास नकार देणाऱ्या थिएटरला टाळे ठोकण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांनी विधान परिषदेत जाहीर केले.

आघाडी सरकारने मराठी रंगीत चित्रपटासाठी प्रत्येकी २० लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. उत्कृष्ट तंत्रनिर्मितीच्या चित्रपटासाठी हे अनुदान ३० लाख रुपये असेल. यंदाच्या बजेटमध्ये तरतूद करण्यात आली आहे. या अनुदानाच्या रकमेविषयी 'जीआर' काढून त्याची अमलबजावणी केली जाईल, अशी ग्वाही पाटील यांनी दिली.

मराठी चित्रपटांच्या चित्रिकरणासाठी गोरेगावच्या चित्रनगरीत व कोल्हापूर येथे ५० टक्के सवलत देण्याचा आदेश सरकारने यापूर्वीच दिला आहे. अर्थसहाय्य अनुदान योजनेचा लाभ २००३ पासून ५२ चित्रपट संस्थांनी घेतला, असे पाटील यांनी सांगितले.

## * नटांना प्रशिक्षणाची गरज

नाटकाचं प्रशिक्षण घेऊन तयार झालेला नट दिग्दर्शकाला मिळाला तर थिएटर हव्या त्या पद्धतीने वाकवता येईल आणि उद्याचं नाटक अधिक संपन्न होईल, असे मत पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्राचे संचालक, नाटककार सतीश आळेकर यांनी व्यक्त केले.

मुंबई विद्यापीठाच्या ॲकॅडेमी ऑफ थिएटर आर्टस विभागाने 'बदलता काळ आणि समकालीन नाटक' या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते. त्याचे उद्घाटन डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते झाले. नाटककार गो. पु. देशपांडे यांनी बीज निबंध सादर केला.

'उद्याचे नाटक' या विषयावर बोलताना सतीश आळेकर यांनी उद्याची रंगभूमी ताब्यात घेणारा रंगकर्मी, आज कुठल्या सामाजिक स्तरातून येतो आणि प्रशिक्षण घेऊन बाहेर पडल्यावर त्याच्यापुढे कोणती आव्हाने उभी ठाकतात याचे विवेचन केले. 'आमच्या तरुणपणी आम्हाला जगण्याचे प्रश्न नसायचे. नऊ ते पाच नोकरी केल्यावर कलेत बंडखोरी करायला आम्ही मोकळे असायचो. त्या तुलनेत आजच्या तरुणाला घरातून-समाजातून नाटक करायला विरोध होत नाही, त्याचे नाटक स्वीकारण्याची लोकांची मानसिकता झाली आहे. परंतु त्याच्यापुढे आज जगण्याचे प्रश्न मोठे आहेत. त्याला अनेक तडजोडी करून मिळेल ते काम करत नाटक करावं लागतं. स्ट्रगल करताना त्याची मोठी ताकद खर्च होते, पण तरीही तरुण मुलं दहा ते पंधरा नाटकं समांतर रंगभूमीवर सादर करत आहेत ही मराठी नाटकाच्या दृष्टीने भाग्याची गोष्ट आहे.'

आज नट नाटककाराच्या शब्दाच्या मागूनच जातो. कारण त्याची तयारी मर्यादित असते, परंतु उर्जेचा संपूर्ण उपयोग करणारा व नाट्यावकाशाशी खेळणारा उद्याचा प्रशिक्षित नट नाटककाराच्या शब्दाच्याहीपुढे जाईल आणि त्या शब्दाची अस्फुट ताकद वाढवेल, असे आळेकर म्हणाले.

अकॅडेमी ऑफ थिएटर आर्टसचे संचालक प्रा. वामन केंद्रे यांनी 'केवळ नटच नव्हे तर रंगभूमीशी संबंधित असलेल्या प्रत्येक घटकाला आज प्रशिक्षणाची गरज आहे,' असे सांगितले.

विद्यापीठाच्या व्याख्यान सभागृहासमोरील 'मुक्त आकाश' या खुल्या रंगमंचाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. विजय खोले यांच्या हस्ते झाले. या रंगमंचावर होणाऱ्या 'वसंतनाट्योत्सवा'चे उद्घाटन प्रभाकर पणशीकर यांनी केले.

## * ग्रंथव्यवहाराचा इतिहास लिहिला जावा - रा. ग. जाधव

स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रंथव्यवहाराच्या इतिहास लेखनाची आवश्यकता असल्याचे मत ज्येष्ठ साहित्यिक रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ आणि इंटरनॅशनल बुक सर्व्हिस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जागतिक ग्रंथदिना'च्या कार्यक्रमात जाधव बोलत होते. डॉ. अरुण टिकेकर लिखित 'अक्षरनिष्ठांची मांदियाळी-ग्रंथशोध व वाचनबोध' या पुस्तकाच्या अनुषंगाने 'ग्रंथसंग्रह व वाचनसंस्कृती' या विषयावर डॉ. अनिल अवचट, डॉ. गं. ना. जोगळेकर आणि डॉ. टिकेकर यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

ग्रंथव्यवहाराच्या इतिहास लेखनाची आवश्यकता असल्याचे सांगून जाधव म्हणाले की, ग्रंथविषयक संवेदनशीलतेचा अनुभव मराठी माणसांनी घेतला पाहिजे. शाळांमधील शिक्षक आणि ग्रंथपाल हेच ग्रंथांची गोडी लावू शकतात. अर्थात, प्रत्येक पिढीच्या ग्रंथप्रेमामध्ये गुणात्मक फरक असला, तरी ग्रंथप्रेम महत्त्वाचे आहे.

ग्रंथसंस्कृतीच्या आणि वाचकांच्या विविध गटांचा सविस्तर आढावा घेताना चांगल्या पुस्तकांचे परीक्षण वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध होत नाही, अशी खंत डॉ. टिकेकर यांनी व्यक्त केली. खूप पुस्तके वाचणे, फार मोठा ग्रंथसंग्रह करणे यापेक्षाही वाचनाने काय परिणाम झाला, हे पाहणे महत्त्वाचे आहे, असेही ते म्हणाले.

माणसाला आत्मविश्वास आणि चांगला भाव जागृत करणे, हे साहित्याचे काम असले पाहिजे. त्यातून माणसांच्या मूल्याधिष्ठित जगण्याला अर्थ प्राप्त होईल, असे डॉ. अवचट म्हणाले. ग्रंथ आणि पुस्तकांना मिळणारा प्रतिसाद व त्यांची विक्री पाहता मराठीची चिंता करण्याचे कारण नाही. पण चांगली पुस्तके मात्र लिहिली गेली पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले.

मराठीच्या ग्रंथव्यवहारात अनेक गफलती असल्याचे प्रतिपादन डॉ. जोगळेकर यांनी केले.

संघाचे अध्यक्ष शरद गोगटे यांनी प्रास्ताविक, डॉ. कल्याणी दिवेकर यांनी सूत्रसंचालन आणि उपेंद्र दीक्षित यांनी आभार मानले.

## पुस्तक परिचय

# खेकडा

**रत्नाकर मतकरी**



### वास्तव आणि अद्भुत घटनांमधूनही उमटणारे भयाचे थंडगार थरार

पोलिसकथा म्हटले की व. कृ. जोशी हे नाव चटकन डोळ्यापुढे येते. त्याचप्रमाणे भयकथा म्हटले की रत्नाकर मतकरी यांचे नाव सर्वात आधी समोर येते. चाळीसेक वर्षांच्या अवधीत मतकरींनी नाटकांची आणि बालनाट्यांची जशी सातत्याने निर्मिती केली तशीच भयकथांच्या क्षेत्रातही आपली प्रयोगशीलता कायम राखून विशिष्ट वाचकवर्गाला नवनवे खाद्य पुरवणे चालू ठेवले. आपल्याकडे भयकथा, पोलिसकथा, गुन्हेगार कथा यांना वाचकवर्ग मोठा आहे आणि मासिकांतून त्यांना आवर्जून स्थान देण्यात येते. अशा रंजक वाङ्मयाची समीक्षक मात्र पुरेशा प्रमाणात दखल घेत नाहीत; परंतु त्यामुळे वाचकांच्या लेखी त्यांचे मोल कमी होते असे सहसा दिसत नाही. वाङ्मयीन समीक्षा आणि लोकप्रिय वाङ्मय यात नेहमीच मोठी दरी दिसते. खरे तर समीक्षेने अशा साहित्याच्या लोकप्रियतेचेही विश्लेषण वाचक-प्रतिसाद सिद्धान्तांच्या प्रकाशात करायला हवे.

'खेकडा' ही रत्नाकर मतकरी यांची खूप गाजलेली कथा या संग्रहाच्या प्रारंभीच देण्यात आली आहे. त्यांच्या कथाकथन शैलीची वैशिष्ट्ये उत्तम प्रकारे प्रकट करणारी ही कथा आहे.

पत्नी हृदयविकाराने गेलेली. माँटेसरीत जाणारी मुलगी पोलिओमुळे बेढब झालेली. काड्यांसारखे हात, पाय, चिकट डोळे, उदास मुद्रा, पाठीवरचे विद्रूप ओझे सांभाळत धावणारा...कुरूप...किळसवाणा खेकडा...त्याची प्रेयसी त्या मुलीला खेकडा असे म्हणते...समुद्र किनारी बसल्यावरही ती खेकड्यांना दगड मारत राहते. खेकडा दगडाआडून डोके बाहेर काढू लागला की तिला भीती आणि किळस वाटते. अंगावर शहारे येतात. त्याच्यावर प्रेम असले तरी असली पांगळी, विद्रूप पोर जन्मभरासाठी गळ्यात बांधून घेणे तिला साफ मंजूर नसते. तो विचारतो,''ती गेल्यावर तरी



करशील ना तू माझ्याशी लग्न?'' तो त्या रात्री तिला शांत झोप- कायमची- लाभावी म्हणून गोळ्या देण्याचे ठरवतो. तो तिला अंथरूणात बसवून एकेक गोळी देऊ लागतो... ती घेऊ लागते. तेवढ्यात बाहेरचा दरवाजा वाजतो. खालच्या बिऱ्हाडातला मुलगा दार वाजवत असतो... तो शेवटी दार उघडतो. ''ती झोपली आहे'' असे तो त्या मुलाला सांगून कटवतो. पण रोजच रात्री येणारा हा मुलगा लौकर घरी गेला तर त्याचे आईवडील काय म्हणतील या विचाराने तो दचकतो आणि त्या मुलाला परत बोलवतो. वेळ घालवण्यासाठी तो त्या मुलाला एक गोष्ट सांगू लागतो...

''एक होता राजा... एक होती राणी... एक राजकन्या. राजा दुसरं लग्न करतो. ही दुसरी राणी राजकन्येचा छळ करू लागते... ती जादू करते. राजकन्येचा खेकडा बनवते... राजाला सांगते,''बिछान्यात खेकडा आहे. तो चावेल. त्याला मारून टाका.'' राजा स्वत:च्या हाताने खेकड्याला मारतो... हे सांगता सांगता त्याला झोप लागते. मुलगा तो झोपलेला आहे असे बघून मुलीकडे जातो... ती झोपलेली...त्याला विचित्र वाटते.... त्याने सांगितलेली गोष्ट आठवते... रोज संध्याकाळी येणारी बाई या मुलीला खेकडा म्हणते हेही आठवते... किती विचित्र गोष्ट... तो म्हणतो.

दुसऱ्या दिवशी ती दोघे उशिरा घरी येतात. तो प्रेयसीला आत जाऊन बघायला सांगतो. ती प्रेयसी आत जाते. तिची किंकाळी त्याला ऐकू येते. तो येऊन पाहतो तर ती खाली जमिनीवर पडलेली असते. निष्प्राण. आणि बिछान्यात त्याला दिसतो एक मोठा खेकडा. नांग्या विस्फारलेला... तो आजूबाजूला बघतो. प्रत्येक कोपऱ्यात त्याला गलेलठ्ठ खेकडा दिसतो. कंपाउंडमध्ये उभा असलेला शेजाऱ्याचा मुलगा ती किंकाळी ऐकून हातातली रिकामी पिशवी सावरीत पळत सुटतो.

> ''पाहिलंस? तू म्हणाली होतीस. तुम्हाला धीर होणार नाही. उद्यासुद्धा तुमच्या बिछान्यात तो खेकडा दिसल्याशिवाय राहायचा नाही. जा-बघ तूच आत जाऊन!''

...रत्नाकर मतकरींनी या कथेत अनेक रंग भरलेले आहेत. पोलिओग्रस्त मुलीला खेकडा म्हणणे... राजाराणीच्या गोष्टीत खेकडा येणे... अंतर्मनातले व्यापार अशा वेगवेगळ्या पातळ्यांवरून सूचित होणे. आणि शेजाऱ्याच्या मुलाने खरोखरच मोठाले खेकडे आणून बिछान्यात आणि खोलीत पसरवून ठेवणे. त्या मुलीची सावत्र आई बनू पाहणाऱ्या त्या तरुणीला बिछान्यात खेकडा बघून मृत्यू येणे... हे सर्व इतके वेगाने व झपाट्याने घडते की वाचकही एकदम सुन्न होतो. ''पाहिलंस? तू म्हणाली होतीस. तुम्हाला धीर होणार नाही. उद्यासुद्धा तुमच्या बिछान्यात तो खेकडा दिसल्याशिवाय राहायचा नाही. जा-बघ तूच आत जाऊन!'' हे त्याचे बोलणे हे खरोखरच दैवदुर्विलासाचे ठरते...

त्यातील 'आयरनी' विलक्षण वास्तव ठरल्याने वाचकाचा थरकाप उडवते.

रत्नाकर मतकरी कथा मोजक्या शब्दांत सांगतात. घटनांचा तपशील नेमका देतात. फापटपसारा टाळतात. योग्य प्रतिमांद्वारे विशिष्ट घटना आणि व्यक्ती वाचकांपुढे नेमकी उभी करतात. 'यांच्या इथं दररोज संध्याकाळी एक बाई येते. नाजूक. ओठ रंगविणारी. रक्तासारखे लाल. बोलते कशी लाडंलाडं...'' शेजाऱ्याच्या मुलाचं हे प्रेयसीबद्दलचं आकलन. त्यातील 'रक्तासारखे लाल' ओठ ही प्रतिमा वातावरण निर्मितीसाठी उपयुक्त ठरते. ती भावी घटनाक्रमामागे असणाऱ्या त्या प्रेयसीच्या रक्तरंजित, रक्तपिपासू वृत्तीची पूर्वसूचनाच देते.

खेकडा आणि पोलिओग्रस्त मुलगी यांच्यातील साम्यही मतकरी पुन:पुन्हा अधोरेखित करतात.

खेकडा...पाठीवरचे विद्रूप ओझे सांभाळीत धावणारा... आकड्यासारखे पाय पुढेमागे हलवत... कुरूप...किळसवाणा खेकडा.

पोलिओमुळे कायमचे व्यंग आलेली मुलगी... काटक्यांसारखे बारीक हातपाय...पाठीवरचे कुबड...घरभर फिरणारा खेकडा...उदास मुद्रा... चिकट डोळे...एखाद्या बेढब प्राण्याकडे बघावे तसा तो तिच्याकडे एका विचित्र कुतूहलाने दयेने, घृणेने आणि शोकाने पाहत राही...''

अशा कथा या केवळ भयकथा राहत नाहीत तर त्या समाजातील कठोर, निर्घृण, क्रूर वास्तवावर चपखल भाष्य करणाऱ्या कथा ठरतात. समाजात अनेक भयंकर, भीषण, भयावह घटना घडत असतात;

या भयकथेतल्या प्रेयसीलाही एक व्यक्तिमत्त्व आहे. खरे ती फार भित्री आहे. साध्या झुरळालाही ती घाबरते. पाल अंगावर पडली तर ती रडून ओरडून घर डोक्यावर घेते. घामाने थबथबते... रात्री तिला घाम फार येतो... तशी ती फार नाजूक आहे. प्लॅस्टिकच्या बाहुलीसारखी... हे बाहुलीपण रंगविलेल्या पापण्या कृत्रिमपणे थरथरत ठेवताना फारच जाणवते... पण ही मनाने खंबीर आहे... मे बी हार्ट ट्रबल... हा नाजूकपणा म्हणजे काही आजार नाही...

अशा छोट्या छोट्या छटांनी प्रेयसीची व्यक्तिरेखा चोहो अंगांनी भरत जाते.

अनेक पोरांना भीक मागायला लावून त्यावर जगणारा दादा...भीक मिळावी म्हणून लंगडी, आंधळी आणि व्यंग असणारी पोरे त्याला हवी असतात. शामूला तो दादा याच कामाला लावण्यासाठी घेऊन जातो. अंगावर कसलेतरी लालसर चट्टे उठवलेले,...केसांच्या जटा झालेल्या अशा एका बाईच्या शेजारी शामूला बसवून तो त्याला भीक मागायला सांगतो. कोणी विचारले तर ती 'हमारी माँ' असे बोलण्यास



तो दादा त्याला बजावतो. येणारे जाणारे लोक त्या बाईकडे बघून पैसे टाकतात. शामू खूष होतो. एक कोवळा पोर आपल्या आजारी आईच्या उशाशी बसलेला बघून लोक उत्साहाने नाणी टाकतात. एक जिवंत शोकांतिका... चित्रपटातच दिसणारी... दु:ख सोसणारा मुलगा... मरणपंथाला लागलेली आई...

शामू त्या बाईसाठी दूध आणतो तर दादा त्याला पैसा कौन देगा विचारतो.

ती बाई मरते. पण मरताना शामूलाही गालावर एक गुलाबी चट्टा देऊन जाते. शामू स्वत:शी म्हणतो, ''अच्छा हुवा. अभी दादा को हाथ या पाँव काटनेकी जरूरतही नहीं पडेगी.''

अशा कथा या केवळ भयकथा राहत नाहीत तर त्या समाजातील कठोर, निर्घृण, क्रूर वास्तवावर चपखल भाष्य करणाऱ्या कथा ठरतात. समाजात अनेक भयंकर, भीषण, भयावह घटना घडत असतात; आणि अनेक पाशवी वा रक्तपिपासू मंडळी त्याचा गैरफायदा घेऊन कृष्णकृत्ये करीत असतात. त्या समाजाच्या भयावह स्थितीचे पडसाद अशा कथांमधून उमटताना दिसतात. मतकरींच्या लेखन कौशल्यामुळे केवळ हकिकतीच्या निवेदनाच्या पातळीवर या कथा घोटाळत नाहीत; त्या समाजाचेही वेगवेगळे, विचित्र, अ-मानवी स्वभावविशेष आविष्कृत करून वाचकाला धक्के देत तसेच विचार प्रवणही करीत असतात.

मतकरींच्या लेखन कौशल्यामुळे केवळ हकिकतीच्या निवेदनाच्या पातळीवर या कथा घोटाळत नाहीत; त्या समाजाचेही वेगवेगळे, विचित्र, अ-मानवी स्वभावविशेष आविष्कृत करून वाचकाला धक्के देत तसेच विचार प्रवणही करीत असतात.

अद्भुताचे, अतींद्रिय शक्तींचेही पाठबळ लाभले की भयकथेची उत्कटता व रंजकता अधिक वाढते.

'पावसातला पाहुणा' मध्ये हरिनाथच्या घरी एका पावसाच्या रात्री एक पाहुणा येतो. त्याच्या हातात नक्षीदार मुठीची काठी असते. हिरवट रंगाचे डोळे, खोल डोहासारखे... भव्य कपाळ... हे पाहुण्याचे रूप दार उघडणाऱ्या तरुण निरांजनीलाही विलक्षण वाटते.

आपण पुराणवस्तूसंशोधक आहोत; नुकतीच कालदुर्गाला भेट देऊन आलोय. कालदुर्गाचा स्वामी कालदमन दुर्गातून बाहेर पडतो आणि या भागात संचार करतो अशी समजूत प्रचलित आहे, चारशे वर्षांचा कालदमन दुसऱ्यांची शक्ती घेऊन पुन: पुन्हा तरुण होत असतो - अशी माहिती तो पाहुणा देतो आणि पाऊस थांबेपर्यंत तेथे राहण्याची परवानगी मागतो. चहा घेता घेता पाहुणा कालदमनाची दंतकथा सांगतो... त्याच्यापाशी एक तलवार आहे, तिच्या मदतीने तो दुसऱ्यांची शक्ती शोषून घेतो... एकदा तो एका वृद्ध सरदाराच्या घरी मेजवानीसाठी जातो.. त्या सरदाराच्या तरुण पत्नीला भरदार छातीच्या पुष्ट बाहूंच्या कालदमनाचे आकर्षण वाटते...मेजवानीनंतर

कालदमन 'रक्तासारख्या लाल मखमलीचे सजवलेल्या दालनात विश्रांतीसाठी जातो.' कालदमन सरदाराला आपली तलवार अर्पण करतो... मद्याच्या धुंदीत गुंगलेल्या सरदाराला मध्यरात्री जाग येते... तो त्या तलवारीला नजरेसमोर धरतो... त्याचवेळी पाहुण्याची काठी निरांजनीच्या पायाशी पडते. निरांजनी ती काठी उचलून घेते. पाहुणा म्हणतो,''तुम्हाला आवडली असेल तर घ्या तुमच्या यजमानांसाठी.'' हरिनाथही ती काठी स्वीकारतात. पाहुणा अर्धवट राहिलेली गोष्ट पुढे सांगतो... ''सरदार श्रीमणी ती तलवार - तिच्या मुठीवरील सर्पाकृती - त्या सर्पाच्या डोळ्यांतील माणसांचा लखलखाट याकडे पाहत राहतात... आणि त्यांना सापाचे डोके हलल्यासारखे वाटते; त्याच्या दोन जिभा वळवल्यासारख्या वाटतात... आणि तलवारीच्या जागी एक काळाकुट्ट सर्प दिसतो... सरदाराचं शरीर मागच्या मागं कोसळतं... कृष्णसर्प त्या सरदाराला दंश करीत त्याची अवघी जीवनशक्ती शोषून घेतो आणि दरवाजाच्या फटीतून निघून जातो.'' कालदमनाकडे तो पोचतो तेव्हा कालदमन त्याचं प्रेमभरानं चुंबन घेतो. ...अधिकच तरुण होतो... आणि सरदारांच्या अचानक निधनाबद्दल दुसऱ्या दिवशी सरदार पत्नीच्या सांत्वनासाठी जायचे ठरवतो...''

- तिच्या मुठीवरील सर्पाकृती - त्या सर्पाच्या डोळ्यांतील माणसांचा लखलखाट याकडे पाहत राहतात... आणि त्यांना सापाचे डोके हलल्यासारखे वाटते; त्याच्या दोन जिभा वळवल्यासारख्या वाटतात... आणि तलवारीच्या जागी एक काळाकुट्ट सर्प दिसतो...

निरांजनीच्या अंगावर ही कहाणी ऐकून शहारे येतात... आपणच सरदार पत्नी आहोत असा भास तिला होतो...

पाहुणा म्हणतो,''मी निघतो आता. हा पाऊस कधी थांबेल कुणास ठाऊक.''

निरांजनी त्याला छत्री देते. तो म्हणतो, ''मी उद्या ही छत्री आणून देईन.''

हरिनाथ निरांजनीच्या मनातील चलबिचल जाणून तिच्यावर काठी उगारतात... तर त्यांना एक काळाभोर सर्प वळवळत येताना दिसतो. ते त्या सर्पाला उचलून त्याच्या तोंडाचे चुंबन घेतात... त्याने आणलेली सर्व शक्ती शोषून घेतात.

निरांजनीला काहीच कळेनासे होते. तो कृष्णसर्प छत्रीचा दांडा बनतो आहे - एवढेच तिला जाणवते...

अद्‌भुताच्या स्पर्शानेही मतकरींच्या कथांना एक वेगळीच रंजकता आणि व्यामिश्रता लाभते.

म्हणूनच 'खेकडा'तील प्रत्येक कथा आपल्याला चक्रावून टाकते.

**पृष्ठे : १२० ● किंमत :८०रु. ● सभासदांना :६०रु. ● पोस्टेज :२०रु.**



# ओमेर्ता

**मारिओ पुझो**

**माफिया डॉनची बदलती मानसिकता**

**अनु. अनिल काळे**




ओमेर्ता ही मारिओ पुझोची कादंबरी इ. स. २००० मध्ये प्रकाशित झाली त्याच्या पूर्ण झालेल्या कादंबऱ्यांपैकी ती शेवटचीच असे म्हणायला हरकत नाही. ही कादंबरी पूर्ण करण्यासाठी आजारी असूनही त्याने आपली ऊर्जा जणू टिकवून धरली होती. त्याच्या अपूर्ण राहिलेल्या कादंबऱ्यांपैकी एक दुसऱ्या एका लेखकाकडून पूर्ण करून घेऊन पुढे प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि इतरही काही पुस्तके या प्रकारे इतर लेखकांच्या मदतीने पुढे बाजारात येऊ शकतील.

'गॉडफादर'ने निर्माण केलेली सिसिलीयन माफिया घराण्यांची आणि कार्यपद्धतीची एकूणच संकल्पना जगभरच्या वाचकांच्या पसंतीला उतरली. गुन्हेगारी जगाच्या संघटित स्वरूपाचे आणि त्यातही पाळल्या जाणाऱ्या अलिखित नीतिनियमांचे मारिओ पुझोने घडवलेले दर्शन जागतिक संघटित गुन्हेगारीला व्यावसायिक अधिष्ठान देणारे ठरले. सध्याच्या अतिरेकी छोट्यामोठ्या संघटनांचे आणि टोळ्यांचे प्रेरणास्त्रोत म्हणून 'गॉडफादर'कडे बोट दाखवता येईल. चोरटी वाहतूक, स्मगलिंग, मादक द्रव्यांचा व्यापार, वेश्याव्यवसाय, मद्यविक्रीकेंद्रे, कॅसिनो आणि हॉटेल व्यवसाय तसेच खंडणीचे प्रकार यातून प्रचंड कमाई होऊ शकते आणि त्यासाठी गुन्हेगारांचे आणि राजकारण्यांचे छुपे लागे बांधे उपयुक्त ठरत जातात - हे गुपित उघड झाले आणि वेगवेगळ्या सेनांद्वारे दहशतीचे तसेच अतिरेकी हिंसाचाराचे प्रकार राजरोस सुरू झाले. १९८० नंतरचे भारतासारख्या देशातील स्थानिक नेतृत्व त्या दृष्टीने अभ्यासण्याजोगे आहे.

'ओमेर्ता' या कादंबरीत या माफिया टोळ्या गुन्हेगारीतून बाहेर पडून, अनैतिक धंद्यातून बाहेर पडून सभ्य व सुरक्षित, कायद्याच्या कक्षेत राहून उद्योगव्यवसाय करण्याच्या प्रयत्नात आहेत, आणि तसे करताना आधीच्या प्रतिस्पर्ध्यांचे सूडवैराचे,

हेव्यादाव्यांचे त्यात जाणवणारे अडसर कसे दुर्लंघ्य ठरतात हे दाखवण्यावर मारिओ पुझोने भर दिला आहे.

ओमेर्ता म्हणजे आपल्याला एखाद्या व्यक्तीने केलेल्या गुन्ह्याची माहिती असली तरी ती कुठल्याही परिस्थितीत इतर कोणाला आपल्या हयातीत न देण्याची शपथ. हा संकेत सिसिलीमधील माफिया टोळ्यांमध्ये एखाद्या व्रतासारखा गणला जातो.

सिसिलीमधील माफियांची कोर्लिओन, क्लेरिकुझिओ आणि झेनोही तीन प्रमुख घराणी.

‘ओमेर्ता’च्या उपोद्घातात मृत्युशय्येवरील डॉन व्हिन्सेंझो झेनोचे दर्शन आपल्याला होते. आयुष्यभर माफिया परंपरा आणि नीतिनियम यांचे पालन करून, व्यापारउद्योजकांकडून खंडणी वसूल करून त्याने भरपूर कमाई केलेली होती. मात्र वेश्याव्यवसाय आणि अमली पदार्थांचा व्यापार यापासून तो कायम दूर राहिलेला होता. उतारवयात एका सुंदर तरुणीशी लग्न करण्याची चूक त्याने केली; त्याला एक मुलगा झाला; पण बाळंतपणातच पत्नी वारल्याने त्या दोन वर्षाच्या मुलाचे आपल्यानंतर काय हा प्रश्न त्याला भेडसावत होता. त्या मुलाची सुरक्षितता आणि त्याच्या संगोपनामध्ये सिसिलियन संस्कारांचा प्रभाव यासाठी काहीतरी व्यवस्था केल्याविना आपल्याला शांतपणे मरण येणार नाही ही त्याची भावना. त्यासाठी तो आपल्या विश्वासातल्या तीन अनुयायी मित्रांना बोलावून सांगतो,'' या हुशार, गुणी मुलाचा पालक म्हणून मला तुम्हा तिघांपैकी एकाची निवड करायची आहे.

गुन्हेगारीच्या या बेभरवशी, कपट कारस्थानांची भरलेल्या दुनियेत जगावं कसं हे रेमंडच आपल्या मुलाला उत्तम प्रकारे शिकवेल अशी त्यात खात्री वाटते. ‘‘रेमंड, माझ्या या मुलाला - ॲस्टरला मी तुझ्या स्वाधीन करतोय. आता तूच त्याचा पिता. त्याला प्राणापलीकडे जप.

या तीन अनुयायांमध्ये क्रॅक्सी हा सर्वात हुशार होता, बियांको महत्त्वाकांक्षी, उत्साही आणि कणखर होता; तर रेमंड एप्रिल हा संयमी, धीरोदात्त होता.

क्रॅक्सी म्हणतो,‘‘तुमच्या मुलाला मी माझ्या मुलासारखंच सांभाळेन.’’

बियांको म्हणतो,‘‘तुमच्या मुलाला मी जन्मापासून ओळखतोय. त्याला मी घेऊन जाईन आणि माझ्या मुलासारखंच वाढवेन.’’

रेमंड एप्रिल म्हणतो,‘‘तुमचा मुलगा हा माझा मुलगा होईल.’’

डॉन झेनो या रेमंडला आपल्या मुलाचा ताबा देतो. गुन्हेगारीच्या या बेभरवशी, कपट कारस्थानांनी भरलेल्या दुनियेत जगावं कसं हे रेमंडच आपल्या मुलाला उत्तम प्रकारे शिकवेल अशी त्याला खात्री वाटते. ‘‘रेमंड, माझ्या या मुलाला - ॲस्टरला मी तुझ्या स्वाधीन करतोय. आता तूच त्याचा पिता. त्याला प्राणापलीकडे जप. आता



मी शांतपणे मरायला तयार आहे.’’... आणि तो शेवटचा श्वास घेतो.

- रेमंड एप्रिल छोट्या झेनोला घेऊन अमेरिकेला येतो.

‘ओमेर्ता’च्या कथानकाला आरंभ होतो तो १९९५ साली. त्यावेळी डॉन एप्रिल हा ६२ वर्षांचा असतो. गुन्हेगारीतून बाहेर पडून सगळ्या शत्रूंचा काटा काढून तो उजळ माथ्याने जगत असतो. जंगजंग पछाडूनही एफबीआय किंवा अमेरिकन पोलिस त्याला कुठल्याही गुन्ह्यात अडकवू शकत नाहीत. तिन्ही मुले आपापल्या व्यवसायात यशस्वीपणे कार्यरत असून वडिलांच्या कृष्णकृत्यापासून सर्वस्वी दूर होती. मोठा मुलगा व्हॅलेरियस, वय ३७, विवाहित. अमेरिकन लष्करात कर्नल. वेस्ट पॉइंट ॲकॅडमीत लेक्चरर. दुसरा मुलगा मार्क अँटोनिओ. वय ३५. एका टीव्ही नेटवर्कमध्ये उच्च पदस्थ. निर्माता. सर्वात धाकटी मुलगी निकोल. वय २९. स्त्रीमुक्तिवादी वकील. खुन्यांना देहदंडाच्या शिक्षेतून वाचवणे आणि बलात्काराचा गुन्हा केलेल्यांना जन्मठेपेच्या शिक्षेतून वाचवणे याबद्दल तिची विशेष ख्याती होती. आपल्या बापाशी ही कायदेपंडित मुलगी सतत वाद घालत असे; आणि त्याला सतावून सोडत असे. त्याशिवाय ॲस्टर हा डॉन एप्रिलचा मानलेला पुतण्या. तो या तिघांपेक्षा डॉनच्या सगळ्यात जवळचा. तो सोळा वर्षाचा होईपर्यंत या तिघांबरोबर त्यांचा सर्वात धाकटा भाऊ म्हणून घरात वावरतो. पुढे त्यात सिसिलीला पाठवण्यात येते.

‘‘माणसाच्या अंगाच्या गुणांपैकी कृतज्ञता हा गुण सर्वात अल्पजीवी असतो, आणि त्यामुळे ही कृतज्ञता जागृत ठेवण्यासाठी अशा लोकांना वरचेवर काही ना काही देत राहावे लागते’’

डॉन रेमंड एप्रिल आपले सगळे अनैतिक धंदे आपल्या संभाव्य शत्रूंना वाटून टाकतो आणि आपल्या निवृत्तीची योजना काळजीपूर्वक आखतो.

‘‘माणसाच्या अंगाच्या गुणांपैकी कृतज्ञता हा गुण सर्वात अल्पजीवी असतो, आणि त्यामुळे ही कृतज्ञता जागृत ठेवण्यासाठी अशा लोकांना वरचेवर काही ना काही देत राहावे लागते’’ हा डॉन रेमंडचा एक आवडता अनुभवजन्य सिद्धान्त होता. त्यामुळे आपल्या अनुयायांना आणि सहकाऱ्यांनाही तो काहीतरी नेहमी देऊन त्यांच्या निष्ठा आपल्यावर कायम राहतील असा प्रयत्न करीत असे. तरीही माणसाचा मूळ स्वभाव हाच प्रभावी असतो हेही त्याला उमगलेले होते. माफियापैकी अजूनही सक्रिय असलेला एकच डॉन सध्या उरलेला होता; तो म्हणजे डॉन टिमोना पोर्टेला. तो अत्यंत खुनशी आणि क्रूर होता. तो अमेरिकेतच जन्मलेला होता आणि अमली पदार्थांच्या व्यापारात तो अग्रगण्य होता. डॉन एप्रिलने फक्त बँकिंग क्षेत्रावर आपले लक्ष केंद्रित करून, निवृत्ती पत्करण्याचे ठरवल्यावर डॉन पोर्टेलाला बोलावून सांगतो

''बँका सोडून बाकीच्या सगळ्या धंद्यांमधून मी अंग काढून घ्यायचे ठरवले आहे. तेव्हा तुला खूप सावध राहावे लागेल. तुला कधीही मदत लागली तर मी ती देईन. निवृत्त होत असलो तरी माझ्या हातात काही गोष्टी राहणारच.''

तेव्हा पोर्टेला म्हणतो,''तुम्ही जो निर्णय घेतलाय त्याबद्दल मला पूर्ण आदर आहे. मी तुमचा मित्र आहे. मित्रच राहीन याची खात्री बाळगा.''

डॉन एप्रिल त्याला त्यावर एक सूचना करतो, ''मित्र या नात्यानं एक सूचना तुला देऊन ठेवतो. एफबीआयचा एजंट सिल्की हा अत्यंत कावेबाज आहे. त्याच्यावर विश्वास ठेवू नकोस. तो तुझ्या पाठीमागे हात धुवून लागेल.''

''मला त्याची भीती वाटत नाही. पण मी सावध राहीन. इतर सर्व माफियांचा त्याने बंदोबस्त केला हे खरे आहे. अपवाद फक्त तू आणि मी... आपण दोघेच काय ते डॉन म्हणून उरलो आहोत या न्यूयॉर्क शहरात... बाकीच्या सर्व माफिया टोळ्या गेल्या दशकात या सिल्कीने नेस्तनाबूत केल्या. आपण दोघे तेवढे त्याला पुरून उरलो...''

मी स्वतःला आता सभ्य समाजाच्या हवाली करतोय. त्या समाजानंच माझं रक्षण यापुढं करावं. त्याबदल्यात समाजासाठी करायची जी कर्तव्यं आहेत ती मी करीन... तू आता माझा पाठलाग थांबवलास तर माझं काम सोपं होईल.''

डॉन एप्रिल सिल्कीलाही आपल्या फार्म हाऊसवर भेटीला बोलावून सांगतो, ''गेली २० वर्षे तू माझा शत्रू होतास. माझ्या मागावर होतास. माझ्या सगळ्या साथीदारांना पकडून तू तुरुंगात टाकलेस. मलाही पकडण्याचा प्रयत्न करीत राहिलास... परंतु तू न्यायबुद्धीनं वागणारा आहेस; बनावट पुरावा तयार करून किंवा माझ्या मुलाबाळांना ओलीस ठेवून तू मला अडकवण्याचा डाव टाकला नाहीस म्हणून मी तुला मानतो... आता मी माझे इतर धंदे बंद केले आहेत; फक्त माझ्या बँका चालू राहतील. मी स्वत:ला आता सभ्य समाजाच्या हवाली करतोय. त्या समाजानंच माझं रक्षण यापुढं करावं. त्याबदल्यात समाजासाठी करायची जी कर्तव्यं आहेत ती मी करीन... तू आता माझा पाठलाग थांबवलास तर माझं काम सोपं होईल.''

''हे ठरवायचं काम एफबीआयचं आहे... इतकी वर्षे मी तुझ्या मागावर आहे. तर आता का थांबू?... कदाचित् एक दिवस तू माझ्या जाळ्यात सापडशीलही.'' या सिल्कीच्या उत्तरानंतर डॉन एप्रिल त्याला म्हणतो, ''मला तुझ्याशी एक सौदा करायचा आहे. गेल्या काही वर्षात तू माफियांविरुद्ध मोहिमेत यश मिळवत आलास, कारण तुला माफियाबद्दलची माहिती कोणीतरी पुरवत असतो. तो खबऱ्या कोण हे मला माहीत आहे. पण ते मी कोणाला सांगितलेलं नाही... मला तुझं थोडं सहकार्य



हवंय...मी तुझ्यापेक्षा वयानं मोठा आहे... मी तुला शत्रू नाही मित्र मानतो. माझ्या सदिच्छा तुझ्या पाठीमागे असतील. माझ्या या ऑफरमुळे तुझा काय फायदा किंवा नुकसान होईल त्याचा तू विचार कर.''

सिल्की डॉनच्या या ऑफरने बुचकळ्यात पडतो.

त्यानंतर डॉन सिसिलीमध्ये असणाऱ्या ॲस्टरला अमेरिकेत बोलावून घेतो. आपल्या मुलांबरोबर अधिक वेळ घालवण्याचा प्रयत्न करतो. ॲस्टरला तो सांगतो,''माझं आता वय झालंय... माझ्या ज्या बँका आहेत, त्यामध्ये माझ्यानंतर प्रमुख वारस म्हणून मी तुला नेमलंय. त्या चालवण्याचे सगळे अधिकार तुला मिळणार आहेत... होणारा नफा तुम्ही चौघं मुलं वाटून घेत जा... काही लोक या बँका विकत घेण्याच्या प्रयत्नात आहेत. पेरू देशाचा इथला कॉन्सल, अमेरिकन सरकार, वगैरे... आपल्या बँका कधीही कुणालाही विकायच्या नाहीत. ही माझी सूचना नव्हे तर आज्ञा आहे. तू त्या आहेत तशा चालवल्यास तरी त्यांची प्रगतीच होत जाईल... अचानक मला काही झालं तर तू कंट्रोलर म्हणून मि. प्रायरची नेमणूक कर... शिकागोतील बेनिटो क्रॅक्सीची मदत घे...त्याशिवाय मी तुला मॅकारोनीचा धंदा काढून देतो. त्यातून तू तुझा खर्च भागवू शकशील... माझ्या मुलांच्या संरक्षणाची जबाबदारीही मी तुझ्यावर टाकतोय. हे जग बेभरवशाचं आणि निर्दय आहे...''

विधी आटोपल्यावर डॉन चर्चच्या पायऱ्या उतरून खाली येतो; शेवटची पायरी उतरत असतानाच एक कार तेथे येते आणि डॉनच्या कपाळाच्या मध्यभागी गोळी लागते. दुसरी गोळी त्याच्या मानेत घुसते आणि मारेकरी पळ काढतात...

आपल्या बारा वर्षाच्या मुलाच्या कन्फर्मेशनच्या विधीचे आयोजन डॉनचा मोठा मुलगा कर्नल न्यूयॉर्कच्या सेंट पॅट्रिक कॅथेड्रलमध्ये करतो...

विधी आटोपल्यावर डॉन चर्चच्या पायऱ्या उतरून खाली येतो; शेवटची पायरी उतरत असतानाच एक कार तेथे येते आणि डॉनच्या कपाळाच्या मध्यभागी गोळी लागते. दुसरी गोळी त्याच्या मानेत घुसते आणि मारेकरी पळ काढतात... डॉनचा निष्प्राण देह फूटपाथवर रक्ताच्या थारोळ्यात पडतो.

ॲस्टर त्या काळ्या गाडीतून जाणाऱ्या मारेकऱ्यांकडे पाहतो.

डॉनच्या हत्येने प्रचंड खळबळ माजते. परंतु त्याच्या मारेकऱ्यांचा पत्ता लागत नाही. त्यावेळी तेथे एफबीआय किंवा पोलिस कोणीच हजर नसतात, याची कल्पना मारेकऱ्यांना असणार., हे ॲस्टरच्या लक्षात येते. मारेकरी डावखुरे आहेत हेही त्याला कळून चुकते...

पुढचा सगळा कथाभाग हा डॉनच्या या हत्येचे सूत्रधार शोधून काढून त्यांचा पूर्ण विध्वंस करणे या अंगाने विकसित होतो. त्या मारेकऱ्यांना सुपारी कोणी दिली,

कोणातर्फे दिली याचा छडा लावला जातो. एफबीयआयचा अधिकारी सिल्की हा डॉनच्या मुलांशी संपर्क साधतो. ॲस्टरचीही जबानी घेतो. डॉनच्या मित्रांचेही सहकार्य ॲस्टर मिळवतो. बँका विकत घेण्याच्या उद्देशाने ॲस्टरवर दडपण आणले जाते. मादक द्रव्यांच्या व्यापारातून होणारा कोट्यवधी डॉलर्सचा काळा पैसा पांढरा करण्यासाठी या बँका ताब्यात असण्याची गरज काही माफियांना वाटत असते; तर व्हॅक्सिनेटर इन्झियो ट्युलिपा याला अणुबाँब बनवण्यासाठी या बँकांच्या माध्यमातून अर्थपुरवठा करण्याचा मार्ग सोयीचा वाटत असतो.

डॉन एप्रिलचा उत्तराधिकारी म्हणून ॲस्टर आपल्या हाती एकेक सूत्रे घेत जातो; आणि डॉनच्या मारेकऱ्यांचा शोध घेतो. माफियांबद्दलच्या बातम्या पोलिसांना देणारा खबऱ्या म्हणजे डॉन एप्रिलचा प्रतिस्पर्धी डॉन पोर्टेला हाच असून, एक खबऱ्या म्हणूनच पोलिस यंत्रणांनी त्याला जिवंत राहू दिले हे ॲस्टरच्या लक्षात आल्यावर त्याचा तसेच त्याच्याशी हातमिळवणी करणाऱ्या सिल्कीचा बंदोबस्त करण्यासाठी ॲस्टर योग्य ती पावले उचलतो; आणि त्या दोघांत प्रथम वितुष्ट आणतो. सिल्कीचे बोलणे टेप करून तो ते पोर्टेलाला ऐकवतो; आणि सांगतो, ''न्यूयॉर्कमधील माफियांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तू सिल्कीला गेली सहा वर्षे मदत करीत होतास; आणि त्या बदल्यात सिल्कीकडून तुला अभय मिळालेले होते. आता तो तुझ्या मागं लागलाय. त्याच्यासाठी तू ओमेर्ताचा नियम मोडलास. त्याला आता तुझी गरज नाही. तू माझ्या बँका विकत घेतल्यास की लगेच तो शिकारी कुत्र्यासारखा तुझ्या मागे लागेल... याचसाठी मी बँका विकत नाही. मी ओमेर्ता मोडणं शक्य नाही.''

मादक द्रव्यांच्या व्यापारातून होणारा कोट्यवधी डॉलर्सचा काळा पैसा पांढरा करण्यासाठी या बँका ताब्यात असण्याची गरज काही माफियांना वाटत असते; तर व्हॅक्सिनेटर इन्झियो ट्युलिपा याला अणुबाँब बनवण्यासाठी या बँकांच्या माध्यमातून अर्थपुरवठा करण्याचा मार्ग सोयीचा वाटत असतो.

या बैठकीनंतर पोर्टेला आपल्या मित्रांना सांगतो, ''माझ्यापुढे मोठा प्रश्न आहे. सिल्की मित्र आहे असे समजून त्याच्यावर मी भरपूर खर्च केलाय. आता तो माझ्यासकट आपल्या सगळ्यांच्या मागे लागणार आहे... त्याचा काटा काढावाच लागेल.''

सिल्कीच्या घरावर हल्ला करण्याची योजना पोर्टेला आखतो आहे हे ॲस्टरला हेस्को या मध्यस्थाकडून कळते.

न्यूयॉर्क पोलिसखात्यातील डिटेक्टिव्ह ॲस्पिनेला वॉशिंग्टन ही निग्रो बाई असते. सिल्की आणि पोर्टेला मिळून ॲस्टरच्या मॅकरोनी फॅक्टरीवर जाऊन त्याला ठार करण्याच्या प्रयत्नात असतात तेव्हा ॲस्पिनेला वॉशिंग्टन ही पोर्टेलाला शस्त्र



खाली ठेवण्यास सांगते. तो ऐकत नाही तेव्हा त्याच्या पोटात दोन गोळ्या मारते. पळून जाणाऱ्या ट्युलिपाच्या मानेलाही ती पिस्तुलाची नळी लावते... सिल्की तिला आवरू पाहतो; आणि 'तू गुन्हेगारीच्या कटात सामील असल्याचा' आरोप करून धमकावू पाहतो आणि तिच्यावर नेम धरतो. त्याचवेळी ती सिल्कीच्या दिशेने गोळी झाडते. ---व्हिडिओ कॅमेऱ्यावर या सर्व प्रकारचे चित्रीकरण झालेले असते. परंतु त्यात आवाज रेकॉर्ड करण्याची सोय नसल्याने एफबीआयच्या अधिकाऱ्यांना ती संपूर्ण फिल्म पुन:पुन्हा बघून आपले निष्कर्ष काढावे लागतात. केवळ स्वसंरक्षणार्थ ॲस्टर ने ट्युलिपावर प्रतिहल्ला केला असा निष्कर्ष निघाल्याने ॲस्टरची या प्रकरणातून निर्दोष म्हणून सुटका होते. मॅकारोनी मॅसाकर म्हणून हे प्रकरण आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजते ॲस्पिनेला वाचते. ती एफबीआयवर हेतुपुरस्सर बदनामी, खुनाचा प्रयत्न आणि नागरी हक्कांची पायमल्ली केल्याबद्दल खटला भरते. ज्युरीं मात्र तिला दोषी ठरवतात. तेव्हा निकोलने आपले वकीलपत्र घेऊन आपल्याला वाचवावे अशी गळ ती घालते. सिल्कीचा अंत्यविधी सरकारी इतमामानं होतो .

डॉन एप्रिलच्या हत्येचा बदला घेणे आणि एप्रिल परिवाराला सुरक्षित ठेवणे ही कामगिरी ॲस्टर पार पाडतो आणि बँकेची जबाबदारी निकोलवर सोपवतो. त्यानंतर सिसिलीला जाऊन आपल्या कुटुंबाच्या आणि गावातील रयतेच्या कल्याणासाठी त्याने प्रयत्नशील असावे ही डॉनची आज्ञा तो प्रत्यक्षात आणतो. आपली प्रेयसी रोझी हिच्याबरोबर विवाह करतो आणि आपल्या मुलाला सूड, प्रेम, शत्रुत्व, दया आणि संधींनी भरलेल्या अमेरिकेतील जीवनाचा अनुभव घेण्याची संधी जरूर मिळावी असा संकल्प सोडतो.

...माफिया जीवनशैलीचे पारंपरिक स्वरूप बदलत आहे आणि अवैध व्यवसायांतून बाहेर पडून वैध धंदे स्वीकारून समाजात उजळ माथ्याने आणि नीतिमत्तेने राहून प्रतिष्ठा मिळवण्याची आशाआकांक्षा माफियांच्या पुढच्या पिढ्यांमध्ये मूळ धरीत आहे.

...माफिया जीवनशैलीचे पारंपरिक स्वरूप बदलत आहे आणि अवैध व्यवसायांतून बाहेर पडून वैध धंदे स्वीकारून समाजात उजळ माथ्याने आणि नीतिमत्तेने राहून प्रतिष्ठा मिळवण्याची आशाआकांक्षा माफियांच्या पुढच्या पिढ्यांमध्ये मूळ धरीत आहे. या परिवर्तनाचा मार्गही तेवढा साधासोपा नाही याची चुणूक 'ओमेर्ता'मध्ये दिसते.


गॉडफादरवर फिदा असणाऱ्या वाचकांना 'ॲस्टर'चे हे वेगळे डॉनपणही आकर्षक वाटेल.

**पृष्ठे :३४१● किंमत :२२०रु. ● सभासदांना :१६५रु. ● पोस्टेज : २५रु.**

# ग्यानबाचं विज्ञान

**डॉ. बाळ फोंडके**

**निसर्गातील विविध वैशिष्ट्यांमागची वैज्ञानिक सूत्रे**




डॉ. बाळ फोंडके यांच्या 'ग्यानबाचं विज्ञान' या संग्रहात चाळीस लेखांचा समावेश आहे. मुलांना जाणवणाऱ्या विज्ञानातील विविध मनोरंजक आणि मूलगामी समस्यांचा उलगडा त्यातून करण्यात आला आहे. त्यासाठी हे सर्व लेख बरेचसे संभाषणात्मक शैलीत लिहिण्यात आले आहेत. ग्यानबा हा अफाट जिज्ञासा असणारा तल्लख बुद्धीचा विद्यार्थी आणि त्याला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करणारे दादासाहेब पंडित या दोघांमधील चर्चांच्या रूपात हे ग्यानबाचं विज्ञान उलगडत जातं.

ग्यानबा हा कुमार आजच्या जिज्ञासू आणि बहुश्रुत मुलांचा प्रतिनिधी आहे. चाकोरीबाहेर जाऊन वर्गात शिक्षकांना तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न विचारून तो बेजार करून सोडतो. त्याच्या डोक्यात हजारो प्रश्नांचे भुंगे सतत भणभणत असतात; आणि त्याच्या प्रश्नांच्या सरबत्तीपुढे वैतागणारे शिक्षक त्याच्या शंकांचे समर्पक समाधान करण्यात अपेशी ठरत असल्याने त्याला छड्यांचा प्रसाद देऊन त्याचे तोंड बंद करण्याचा मार्ग चोखाळत. त्यामुळे शाळेत त्याचे मन रमणे अधिकच दुरापास्त ठरलेले. घरचे लोकही त्याच्या शंकाकुशंकांनी हैराण झालेले. दिवसभर गुरे राखायला त्याला घराबाहेर पिटाळून थोडीफार तरी शांतता मिळवण्यासाठी ते उत्सुक.

तर अशा या ग्यानबाचे गावरान ठसक्यातले प्रश्नही तसेच तऱ्हेवाईक असत. ''त्यो उंट कसा वाळवंटात अनवाणीच चालतुया. त्याचं पाय कसं पोळून निघत न्हाईत? आनि त्याचं त्वांड कसं कोरडं पडत न्हायी? माझं पाय पोळून निघालेत न्हवं या उनापायी. आगागागा. पायाची अक्षी आग व्हतीया बगा. वाटतंय की चुलीतल्या लाकडागत जळून खाक व्हनार- की काय? छ्या छ्या, काय ह्यो उनाचा कार,



वैसाकवणवाच पेटलाय बगा. घसा सुदीक कोरडा पडलाय. तहान तहान व्हाया लागलीया.''

आपली पावलं आणि उंटाची पावलं यामधला फरक ग्यानबाला जाणवतो; आणि वाळवंटात चालतानाही उंटाला उष्णतेचा त्रास कसा होत नाही असा प्रश्न त्याला पडतो.

आकाशातलं इंद्रधनुष्य बघूनही ग्यानबाला मोठेच स्फुरण चढते. ते बघण्यासाठी चला म्हणून सांगायला तो दादासाहेबांकडे धावत येतो. 'चेमत्कारच म्हनायचं न्हाय तर काय! लई गम्मत आलीय बघा. त्ये काय आबाळात भलं मोठं इंदरधनुष उगवलंय न्हवं का.... आकाशातला तोरण बांदल्यावानीच दिसतंया. पर मला येक कळंना जालंय की सूर्याला पाट दाकवल्याबिगर त्ये आपल्या नजरंला का पडत न्हाय? सूर्याकडं तोंडकरून उबं राह्यलं तर पार दिसत न्हाय. काय बी करा...'' मात्र इंद्रधनुष्य हे पाऊस असला तरच दिसतं हेही त्याच्या लक्षात येतं. पाण्याच्या थेंबातून सूर्याचा प्रकाश पलीकडे जाताना हे रंग वेगवेगळे होतात; आणि म्हणूनच सूर्य पाठीमागे आणि पावसाचे थेंब पुढ्यात आसपास असल्याशिवाय इंद्रधनुष्य दिसत नाही हे दादासाहेबांचे उत्तर त्याला चालना देते.

ग्यानबाचं कुतूहल एवढ्यावर थांबत नाही. या इंद्रधनुष्याला पकडण्यासाठी तो उत्सुक आहे. पांडबाच्या शेतात त्याचं एक टोक त्याला दिसतं. तेव्हा ते पकडून त्याचं दुसरं टोक गाठायचं असा त्याचा जंगी प्लॅन असतो.

ग्यानबाचं कुतूहल एवढ्यावर थांबत नाही. या इंद्रधनुष्याला पकडण्यासाठी तो उत्सुक आहे. पांडबाच्या शेतात त्याचं एक टोक त्याला दिसतं. तेव्हा ते पकडून त्याचं दुसरं टोक गाठायचं असा त्याचा जंगी प्लॅन असतो.

पांडवाच्या शेतात पोचल्यावर खरोखर इंद्रधनुष्याचं टोक ग्यानबाच्या हातात येईल का? की ते दूर गेलेले असेल? इंद्रधनुष्यापर्यंत पोचणे त्याला शक्य होईल का? क्षितिजाजवळ कधी कोणी पोचू शकते का?...हे प्रश्न दादासाहेब त्याला विचारतात आणि 'आपल्यापाठी असलेल्या पावसाच्या थेंबा मागून त्यो प्रकाश पल्याड जाऊन इंद्रधनुष्य तयार झालेलं असेल ना!' अशी त्यावर ग्यानबाची मल्लीनाथी - अशी जुगलबंदी रंगत जाते.

गाढ झोप, सावध झोप आणि रॅपिड आय मूव्हमेंट (बुबुळं अस्वस्थ होऊन एकसारखी वेगानं फिरत राहतात अशा प्रकारची झोप)- यांची पाचसहा चक्रं तरी झोपेच्या काळात पूर्ण होतात. एका प्रकारच्या झोपेतून दुसऱ्या प्रकारच्या झोपेत जाणे काही जणांना सोपे जाते; तर काही जणांना सावध झोप जास्त प्रमाणात लागते...

ग्यानबाला हा झोपेच्या चक्राचा एकूण प्रकार मंजी सगळा घोळच वाटतो.

पावसाचे ढग काळेच असतात. पांढरे नसतात असे का?

सफरचंद, चेरी, स्ट्रॉबेरी यासारखी थंड हवामानात उगवणारी फळं फ्रीजमध्ये ठेवल्याने अधिक टिकतात. पण केळी ही उष्ण कटिबंधात होतात. ती फ्रीजमध्ये ठेवली तर काळी पडतात. थंडीमुळे त्यांना इजा होते. ती नासू लागतात. लिबलिबीत होतात.

कांदा कापताना ग्यानबाच्या डोळ्यातून पाण्याची धार लागते. असे का होते? प्रॉपेनिल सिस्टेईन सल्फॉक्साइड हे रसायन कांदा कापायला घेतल्यावर त्यातून पाझरू लागते; त्यामुळे कांद्यातच असलेली ॲलिसिन नावाची एक रासायनिक कातरी त्या पाझरणाऱ्या रसायनाचे तुकडे करून त्यातून प्रॉपॅन्थाइल ऑक्साइडला मोकळे करते हे रसायन हवेत सहज उडून जाणरे असते. तेच आपल्या डोळ्यांत जाऊन भिडते; डोळ्यांमधल्या पाण्याशी त्याची प्रक्रिया होऊन त्याचे तुकडे होतात. त्या तुकड्यापैकी एक सल्फ्युरिक आम्ल असते; त्या आम्लाचा डोळ्यातल्या नाजूक त्वचेवर परिणाम होऊ नये म्हणून, आपले शरीर त्या आम्लाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न करते. डोळ्यांजवळच्या अश्रूग्रंथींमधून आसवं वाहू लागतात. या अश्रूग्रंथींना काम करायला लावण्यात कांद्यातील सल्फरयुक्त रसायन भलतेच वाकबगार असते. कांदा पाण्याखाली धरून कापायला घेतला तर मग प्रॉपेन्थाईल सल्फॉक्साइड हे रसायन हवेत उडून जाणार नाही. शिवाय ते तयार होताना अवतीभवती पाणीच पाणी असल्याने तिथे तयार होणारे सल्फ्युरिक आम्ल पाण्यातच विरघळून जाईल. साहजिकच डोळ्यांतून पाणी येणार नाही.

कांदा पाण्याखाली धरून कापायला घेतला तर मग प्रॉपेन्थाईल सल्फॉक्साइड हे रसायन हवेत उडून जाणार नाही. शिवाय ते तयार होताना अवतीभवती पाणीच पाणी असल्याने तिथे तयार होणारे सल्फ्युरिक आम्ल पाण्यातच विरघळूनजाईल. साहजिकच डोळ्यांतून पाणी येणार नाही.

पण स्वाद-गंधात हा कांदा कमी पडतो. तो खाताना ती गंमत येत नाही.

कांदा कापताना डोळ्यांत आसवं येऊ नयेत म्हणूनही काही मार्ग आहेत. कांदा चिरताना जोरजोरात श्वासोच्छ्वास केला तर ही रसायने डोळ्यांकडे जाण्याआधी तोंडाकडे ओढली जातील; आणि डोळ्यांतून पाणी येणे टाळता येईल.

वरच्या ओठाखाली लिंबाची फोड ठेवली तरी डोळ्यांमधून पाणी गळणे कमी होईल.

निसर्गात अशा अनेक गोष्टी दिसतात. त्याबद्दल कुतूहल वाटते. पावसाचा थेंब



चेंडू सारखा गोलगरगरीत असतो. पण गळक्या नळातून बाहेर पडणारा पाण्याचा थेंब वरच्याबाजूला टोक आल्यासारखा आणि खालच्या बाजूला पसरट असे का दिसते?

पावसाचा वास येतो म्हणजे काय होते?

शिंका का येतात?

मिरची तिखट का लागते?

तापवलेल्या लोखंडाचा रंग लाल दिसतो. तापमान वाढत जावे तसतसा तो पिवळा, नंतर निळसर आणि काळपट दिसू लागतो. असे का?

आरशात बघताना आपली उजवी बाजू उजवीकडे आणि डावी बाजू डावीकडेच का दिसते?

पक्षी झोप कशी घेतात?

ग्यानबाला पडलेल्या अशा प्रश्नांची उत्तरे दादासाहेब देतात; आणि त्यामुळे ग्यानबाचे कधी समाधान होते तर कधी त्या उत्तरातून नव्याच शंका त्याच्या मनात डोकावतात. असे हे सत्र सारखे सुरूच राहणार असते; त्यामुळेच ज्ञानात भर पडणार असते.

निसर्गाचे अवलोकन, निरीक्षण त्यासाठी आवश्यक असते. त्या निरीक्षणाच्या संदर्भात नेमका प्रश्न विचारता येणे ही पुढची पायरी. प्रश्न योग्य तऱ्हेने विचारता आली तर त्याचे समजण्यासारखे व पटण्यासारखे उत्तरही देणारे कोणी ना कोणी भेटतेच. निरीक्षण शंका, प्रश्न आणि उत्तर व समाधान ही प्रक्रिया अखंड चालू राहणे हाच ज्ञानसंपादनाचा खरा मार्ग होय.

निरीक्षण शंका, प्रश्न आणि उत्तर व समाधान ही प्रक्रिया अखंड चालू राहणे हाच ज्ञानसंपादनाचा खरा मार्ग होय.

'ग्यानबाच्या विज्ञानातून'मुलांमधील ही प्रवृत्ती जोपासली जावी. पालकांना आणि शिक्षकांनाही मुलांच्या रास्त जिज्ञासेला योग्य प्रकारे प्रतिसाद देता यावा. केवळ दडपशाही, मुस्कटदाबी वा छडीचा प्रसाद हे मार्ग अवलंबून जिज्ञासेला थोपवण्यात खरे पालकपण नाही हेही त्यांना या पुस्तकामुळे जाणवले तर उत्तम!

**पृष्ठे : १३६ ● किंमत : १३०रु. ● सभासदांना : ९८रु. ● पोस्टेज : २०रु.**



**विज्ञान प्रपंच** डॉ. बाळ फोंडके

**दैनंदिन जीवनातल्या विविध घटनांमधील विज्ञान उलगडून दाखवणाऱ्या दिलखुलास गप्पा**

किंमत : १५० रु. सभासदांना : ११३रु. पोस्टेज : २०रु.

# पुरस्कार

## * स्वामीकार रणजित देसाई पुरस्कार

स्वत:ची कीर्ती वाढविण्यासाठी व पुस्तकी पंडित बनण्यासाठी साहित्य निर्मिती नसावी; साहित्यातून मानवी मनाचे चिंतन आणि व्यापक मानवतावादी दृष्टिकोन मांडावा, असे मत ज्येष्ठ साहित्यिक आनंद यादव यांनी व्यक्त केले.

मेहता पब्लिशिंग हाऊस फाऊंडेशनच्या वतीने उत्कृष्ट साहित्य निर्मिती करणाऱ्या लेखकांना 'स्वामी'कार रणजित देसाई पुरस्कार देण्यात आले.

मान्यवर साहित्यिकांच्या उपस्थितीत लेखक प्रसन्नकुमार पाटील यांना 'जबाला ते मेधा' या काव्यसंग्रहासाठी, सुरेश वसंत नाईक यांना 'या सुखांनो' या ललित गद्यासाठी तर मृणालिनी गडकरी यांना 'काबुलीवाल्याची बंगाली बायको' या अनुवादासाठी पुरस्कार प्रदान करण्यात आले. स्मृतिचिन्ह, रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप असून पुरस्काराचे यंदाचे सहावे वर्ष आहे.

डॉ. यादव पुढे म्हणाले, ''चित्रपट, नाट्य, संगीत, शिल्प, चित्रकला या साऱ्याची कोल्हापूरला खूप मोठी परंपरा आहे. कोवाड सारख्या ग्रामीण भागात राहूनसुद्धा रणजित देसाई यांनी एखाद्या ऋषीसारखी तपश्चर्या करत साहित्याची




*डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना सुरेश नाईक*



सेवा केली. आणि आपल्या साहित्यसंपदेने संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले. अशा कलावंताची ही भूमी पुन्हा एकदा साहित्यनिर्मितीचे केंद्र बनावी. केवळ साहित्याचे रसिक न राहता प्रत्येकाने रसिकतेला कलेची जोड द्यावी व साहित्यनिर्मिती करावी.'' साहित्याविषयीची नेमकी जाण व विशिष्ट दिशा घेऊन मेहता पब्लिशिंग हाऊस कार्य करत आहे, असा गौरव त्यांनीही केला.

प्रसन्नकुमार पाटील म्हणाले, 'जबाला ते मेधा' या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून वेदकाळातील जबाला, कुंती, महाभारतातील द्रौपदी ते आताच्या किरण बेदी मेधा पाटकर यांच्या व्यथा-कथांना शब्दरूप दिले आहे. सुरेश नाईक यांनी सामान्यातल्या सामान्य माणसांना उमजेल अशा साध्या सोप्या भाषेत साहित्यनिर्मिती केली तर त्या कलाकृतीचा आस्वाद आणि आनंद लुटता येतो, असे सांगितले. मृणालिनी गडकरी यांनी बंगाली भाषेतील समृद्ध विचाराच्या व ज्ञानाच्या कक्षा रुंदावणारं सकस साहित्य मराठी वाचकांना उपलब्ध व्हावं म्हणून अनुवाद केल्याचे स्पष्ट केले. प्रेमभंगातून नैराश्य आल्यानंतर अफगाणी इसमाशी लग्न केलेल्या सुश्मिता बॅनर्जीची कहाणी संस्कृती संस्कृतीमधील फरक, स्त्रियांकडे बघण्यांचा दृष्टिकोन, जगण्यातील दाहकता मांडते असे त्यांनी सांगितले.

मेहता फाऊंडेशनचे अनिल मेहता यांनी प्रास्ताविक केले. सुप्रिया वकील यांनी सूत्रसंचालन केले. सुनील मेहता यांनी आभार मानले. डॉ. व्ही. डी. कटांबळे, डॉ. मंदा कदम इ. उपस्थित होते.

## * 'माझं पुस्तक' ला विशेष पुरस्कार

चंद्रकला प्रकाशनाच्या संचालिका शशिकला उपाध्ये यांनी लिहिलेल्या 'माझं पुस्तक' या पुस्तकाला फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स या दिल्लीच्या संस्थेने विशेष पुरस्कार जाहीर केला आहे.

प्रकाशन व्यवसाय, प्रकाशनाचा इतिहास, लेखक प्रकाशक संघ, कॉपीराईट इत्यादी प्रकाशन व्यवसायाशी संबंधित विषयांवरील एकूण ५७ पुस्तकामधून १० पुस्तकांची निवड पुरस्कारासाठी करण्यात आली. त्यांत 'माझं पुस्तक' चा समावेश आहे. श्रीमती उपाध्ये यांचे प्रांजळ भाषेतील हे आत्मकथन वाचकप्रिय ठरले आहे. गेली २१ वर्षे श्रीमती उपाध्ये 'चंद्रकला प्रकाशन' ही संस्था चालवित असून एफआयपी या दिल्लीच्या संस्थेतर्फेच १९९९ मध्ये त्यांना कर्तबगार स्त्रीप्रकाशक म्हणून सन्मानित करण्यात आले होते.

## * डॉ. जयसिंगराव पवार यांना शाहू ग्रंथ पुरस्कार

आत्मचरित्र लिहिण्यापेक्षा विभूतीचे चरित्र लिहिणे अवघड असते, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. केशव मेश्राम यांनी इतिहास संशोधक प्रा. डॉ. जयसिंगराव पवार यांना शाहू ग्रंथ पुरस्कार देताना केले.

श्री. मेश्राम म्हणाले, ''सध्या महिन्याला पंचवीस ते पन्नास काव्यसंग्रह प्रकाशित होत आहेत. कोणीही लेखक व प्रकाशक बनत आहे. मात्र सत्याचा शोध कुणीही घेण्याचा प्रयत्न करीत नाहीत.''

डॉ. पवार म्हणाले,''हा ग्रंथ मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत अनुवादित केला जात आहे. या ग्रंथाची तीन खंडांत विभागणी आहे. त्यात शाहूंच्या जीवनातील घडामोडींसह शाहूंनी स्त्रियांसाठी केलेले कायदे, २५ आंतरजातीय विवाह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पत्र, १२० दुर्मिळ छायाचित्रे यांचा समावेश आहे.''

### * कविताबाई पारगावकर यांना पठ्ठे बापूराव पुरस्कार

शाहीर पठ्ठे बापूराव यांच्या ५८ व्या पुण्यतिथीनिमित्त पठ्ठे बापूराव प्रतिष्ठान व सांस्कृतिक कला मंडळ पुणे यांच्या वतीने प्रथम हडपसर उपनगरात लावणी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

१९९८ सालापासून देण्यात येणाऱ्या पठ्ठे बापूराव पुरस्काराचे हे सातवे वर्ष आहे. वयाच्या ११ व्या वर्षापासून पायात घुंगरू बांधून लावणीतून अदाकारी सादर करणाऱ्या ज्येष्ठ कलावंत कविताबाई पारगावकर यांना अकरा हजार रुपयांचा हा पुरस्कार खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते देण्यात आला.

### * हिंदी साहित्य पुरस्कार

वेणुताई चव्हाण कॉलेजातील हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. वाय. बी. धुमाळ यांना, हिंदी साहित्यलेखन व संशोधनाबद्दलचा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार उत्तर प्रदेश सरकारने जाहीर केला आहे. २५ हजार रुपयांचा हा पुरस्कार आहे. सोळाव्या आंतरराष्ट्रीय हिन्दी साहित्यिक सम्मेलनात उत्तर प्रदेशच्या राज्यपालांच्या हस्ते हा पुरस्कार दिला जाईल.

### * अण्णा भाऊ साठे पुरस्कार

राज्य सरकारतर्फे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कारासाठी मातंग समाजातील कलावंत, साहित्यिक व समाजसेवक यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. मातंग समाजासाठी दहा वर्षांपेक्षा जास्त काळ उल्लेखनीय कार्य केलेल्या ५० वर्षांवरील पुरुषांना तर, ४० वर्षांवरील स्त्रियांनी समाजकार्याच्या पुराव्याची कागदपत्रे, जन्म दाखला, पोलिसांकडून मिळालेला चारित्र्याचा दाखला व फोटोंसह अर्ज पाठवावा. : विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई शहर, प्रशासकीय इमारत - १ चेंबूरकर मार्ग, मुंबई ७१.

### * 'देशी वाण' ला प्रा. जोग समीक्षा पुरस्कार

मराठी साहित्य परिषदेतर्फे दरवर्षी दिला जाणारा प्रा. रा. श्री. जोग समीक्षा पुरस्कार यंदा समीक्षक डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर यांना देण्यात आला आहे. लेखकाला तीन हजार रुपये व प्रकाशन संस्थेला ५०० रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. अक्षर प्रकाशनने हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे.



### * सह्याद्री नवरत्न पुरस्कार

विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सह्याद्री नवरत्न पुरस्कार २२ एप्रिलला वरळीच्या दूरदर्शन केंद्राच्या प्रांगणात शानदार सोहळ्यात दिले गेले. स्नेहल भाटकर (स्वररत्न), राजदत्त (चित्ररत्न), सुलभा देशपांडे (नाट्यरत्न), डॉ. अभय बंग-राणी बंग (सेवारत्न), सुभाष दांडेकर-दिलीप दांडेकर (उद्योगरत्न), डॉ. विश्वनाथ कराड (शिक्षणरत्न), नामदेव ढसाळ (साहित्यरत्न) असे पुरस्कार आहेत, तर गेट वे ते धरमतर व गेट वे ते एलिफंटा हे अंतर विक्रमी वेळात कापणाऱ्या ६ वर्षांच्या जलतरणपटू सानिका तोडणेकर हिला बालरत्न तर ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्त्या मृणाल गोरे यांना 'रत्नशारदा' आणि दिनू रणदिवे यांना 'रत्नदर्पण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### * प्रकाशकांनी भविष्यकालीन आव्हानांचा वेध घ्यावा

'इलेक्ट्रॉनिक मीडिया, कम्प्युटर यांचाच पुढचा टप्पा म्हणून या शतकाअखेर कागदविरहित समाजजीवनाकडे आपली वाटचाल होणर आहे. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला विज्ञान मानवाच्या सर्व समस्या सोडवील, हे विसाव्या शतकात आपण पाहिलेले स्वप्न भाबडे ठरले आहे आणि गूढ अध्यात्म, ईश्वरकल्पना याकडे लोकांचा ओढा वाढत आहे. असे मत दिनकर गांगल यांनी व्यक्त केले.

केशव भिकाजी ढवळे संस्था शताब्दी समारोह समितीतर्फे पारितोषिक वितरण समारंभ विलेपार्ले येथील लोकमान्य सेवा संघात झाला.

प्रत्येकी पाच हजार रुपये, शाल, मानपत्र या स्वरूपातील हे पुरस्कार आहेत.

हैदराबादला ४० वर्षे मराठी साहित्यप्रसाराची चळवळ व 'पंचधारा' हे वाङ्मयीन नियतकालिक चालवणारे संपादक द. पं. जोशी यांना घोषित झालेला 'केशव भिकाजी ढवळे' पुरस्कार त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या भगिनी मालती कस्तुरे यांनी स्वीकारला.

'महाराष्ट्र टाइम्स'च्या नीला वसंत उपाध्ये यांना 'बा. ग. ढवळे पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. त्यांनी पारितोषिकात स्वत: भर घालून तो दादरच्या अखिल भारतीय कीर्तन संस्थेच्या ग्रंथालयाला दिल्याचे जाहीर केले.

गिरगावातील न्यू अँड सेकंडहँड बुक डेपोच्या ६० वर्षांच्या सेवेनंतर यंदा निवृत्त झालेले ज्येष्ठ ग्रंथविक्रेते श्री. चंद्रकांत मानकामे यांना मंगेशराव नारायण कुलकर्णी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

प्रमुख पाहुणे डॉ. सुभाष भेंडे यांनी विजेत्यांचा गुणगौरव करून, या योजनेत शब्दांकन करणारे, टीव्हीमालिका लिहिणारे यांचाही विचार व्हावा, असे सुचवले.

समारोह समितीचे कार्याध्यक्ष सदानंद भटकळ यांनी प्रास्ताविक केले. जयंत साळगावकर यांनी आभार मानले. ❐

## साधंसुधं...

# सातव्या खोलीचा दरवाजा

**प्रमोदिनी वडके-कवळे**

एका राजाने आपल्या लाडक्या लेकीसाठी सुंदर महाल बांधला. त्यात सगळ्या सुखसोयी होत्या. फक्त त्याने आपल्या मुलीला एकच अट घातली होती... ''त्या सातमजली महालाच्या कोणत्याही दालनात, बाहेरच्या पुष्करणीत वावरलीस तरी चालेल. पण सातव्या मजल्यावरच्या सातव्या दालनाचा दरवाजा मात्र उघडू नकोस. नाहीतर तू दु:खी होशील...''

लहानपणी वाचलेल्या परीकथांमधला हा एक महत्त्वाचा भाग. आपण सगळ्यांनीच लहानपणी ही किंवा अशा प्रकारची एकतरी गोष्ट वाचलेली असते. अगदी सगळ्या भाषांमधल्या लोककथेत अशा प्रकारच्या गोष्टी असतात... सातव्या मजल्यावरच्या सातव्या दालनाचं हे उघडायला मनाई असलेलं दार जगातल्या सगळ्याच मुलांच्या बालपणात एकदा तरी येऊन गेलेलं असतंच.

पुढची घटनाही ठरलेली. उत्सुकता अनावर होऊन अखेर राजकन्या ते दार उघडते आणि त्यातून काहीतरी भयंकर बाहेर पडतं... कधी एखादी चेटकीण, कधी अंगभर टेंगळं आलेला कुरूप म्हातारा तर कधी जगभरातली सगळी दु:खं आणि काळज्या...

लहानपणी अशा प्रकारची गोष्ट वाचायला लागल्यावर मला प्रश्न पडायचा आता या खोलीतल्या बंद दरवाजाआडून काय निघणार?

वय वाढलं. अनुभव साचले आणि विचारांची दिशा फिरली तसा मनातला प्रश्नही बदललाय. आता ती गोष्ट आठवली की वाटतं, सगळी सुखं पायाशी अशी लोळण घेत असताना त्या राजकन्येला तरी त्या सातव्या दालनाच्या दरवाजाचा मोह कशाला पडायचा? त्या दरवाजावाचून तिचं काय नडलं होतं?

कधीतरी स्वच्छतेचा झटका आला की मी घरातल्या सगळ्यांचे कपडे धुवायला काढते. मुलगा घाईगडबडीने कॉलेजला निघालेला असतो. माझा 'धुलाई-अवतार' बघून त्याच्या छातीत धडकी भरते. जाताजाता तो ओरडून सांगतो,''आई, माझी काळी पँट घेऊ नकोस हं. ती माझी मी धुवून टाकीन आल्यावर.''

झालं! माझा उत्साह ओसरून अंगात संशय संचारतो. मुलगा पुरेशा अंतरावर पोचल्याची खात्री होताच मी पुढ्यातला कपड्यांचा ढीग बाजूला सारते. आणि आधी त्याची काळी पँट शोधून काढते... काय दडवलेलं असेल त्याने यात? एखादं प्रेमपत्र? चोरून पाहिलेल्या सिनेमाची तिकीटं? बेहिशोबी पैसे? की आणखी कसली घातक कागदपत्र?.. आजकालच्या मुलांचं काही सांगता येत



नाही. कधी कुठल्या धारेला लागून वहावत जातील नेम नाही...वेळेवरच आवरलं पाहिजे...

पँटच्या खिशापर्यंत हात पोचायच्या वेळात माझ्या मनात कितीतरी शंकांची वावटळ उठून जाते. पँटचे तट्ट फुगलेले दोन्ही खिसे बघून छाती धडधडायला लागते... काय भरलं असेल या खिशात?

त्या खिशात कोंबलेले असतात पंधरावीस न धुतलेल्या रूमालांचे बोळे. कारण आमच्या युवराजांना हातरुमाल धुवायचा, धुवायला टाकायचाही कंटाळा!

त्याची ही सवय ठाउक असूनदेखील पुढच्यावेळी त्याने पँटला हात लावू नकोस सांगितलं की पुन: मी घईघाईने तपासकार्य सुरू करतेच.

कारण गोष्टीतल्या त्या राजकन्येपासून ते अगदी रांगत्या बाळापर्यंत प्रत्येकाला आकर्षण असतं ते 'हात मत लगाना'वाल्या गोष्टींचं.

कुतुहल हा प्रत्येक सुदृढ सजीवाचा स्थायीभाव आहे. कुठेही फट दिसली की आत डोकवावंसं वाटणं हे तुमची विचारशक्ती ठणठणीत असण्याचंच लक्षण आहे. म्हणून तर बाँब फुटण्याच्या एवढ्या घटना घडूनसुद्धा सुरक्षापथकाला वेळोवेळी टाहो फोडून सांगावंसं वाटतं - 'अनोळखी वस्तूला हात लावू नका.'

आपल्या आकलनशक्तीच्या पलिकडे असणाऱ्या एखाद्या घटनेबद्दल कुतुहल वाटून माणसं त्याच्या मागे लागतात. कितीही विरोध झाला तरी त्यातलं रहस्य शोधायला धडपडतात.... ज्यांना यात यश येतं ते शास्त्रज्ञ म्हणून नावाजले जातात आणि जे अयशस्वी होतात ते चक्रम म्हणून ओळखले जातात. दोघांच्याही वर्तनामागची प्रेरणा एकच... या टोपीखाली आहे तरी काय?

प्रत्येकाची विचारशक्ती वेगवगळ्या अंतरापर्यंत जाऊन थांबते. आपापल्या विचारांची कुवत जिथे संपते तिथे अशी एकेक टोपी ठेवलेलीच असते. त्या टोपीखाली असतं मीठ... आपल्या आयुष्याला चव आणणाऱ्या या मिठाची रूपं प्रत्येकासाठी वेगवेगळी असली तरी त्याचं रासायनिक सूत्र एकच असतं... हाताला न येणारी गोष्ट + तिच्याबद्दलचं अपार कुतूहल = आयुष्याचा स्वाद.

हे मीठ आयुष्याला चवही आणतं आणि आणखी जगण्याची ओढही टिकवून ठेवतं.

ज्या गोष्टीतलं रहस्य उलगडतं त्याची चव हळूहळू कमी होत जाते. एखादा खेळ जिंकण्याची ईर्ष्या कुठपर्यंत? त्या डावातल्या युक्त्याप्रयुक्त्या कळेपर्यंतच! कसंही करून डाव जिंकता येऊ शकतो अशा एकूणएक खाचाखोचा कळून आल्या की खेळण्यातली मजाच निघून जाते. पत्ते

एकट्याने खेळून काही लोकं आपलं मन रमवतात खरं, पण त्यांच्या हालचाली किती कंटाळवाण्या असतात? कारण केवळ वेळ घालवण्यासाठीच ते खेळत असतात... पत्रे खेळण्याची मजा कधी? समोरच्याच्या हातातली पानं दिसत नाहीत तोपर्यंतच! सगळी पानं खुली झाली की मग तो डाव खेळायचा डाव उरत नाही. ते बनून जातं एकापुढे एक पत्ते लावण्याचं नीरस आणि यांत्रिक काम.

या कुतुहलाने जगण्यातली मजा तर वाढतेच, पण तुमची कल्पनाशक्तीही तीव्र होते. रोजचाच ओळखीचा परिसर. पण धुक्याने वेढला की तो वेगळा दिसतो का?

तिथे सारं काही खुलं, स्पष्ट नसतं. अस्पष्टातून येणारा अतिशय मोहक असा आभास त्यात असतो. हे अदृष्ट कल्पनेला आव्हान देणारं.. जो तो आपापल्या कल्पनेनुसार त्यात सौंदर्य शोधतो. भर घालून, वाढवून त्या सौंदर्याचे मिनार-महाल इतरांच्या नजरेसमोर उभे करतो... आपल्याला येत नसलेल्या कुठल्याही गोष्टीचं आकर्षण वाटतं ते या अस्पष्टाच्या आभासामुळेच!

मध्यंतरी माझ्या एका मैत्रिणीच्या मुलीला कलाकौशल्याचं वेड लागलं होतं. चित्रकला, भरतकाम, मेणाच्या वस्तु, कागदी फुलं, कापडी बाहुल्या...धडाधड ती सगळ्या क्लासेसना नावं नोंदवायला लागली. फटाफट सगळ्यात हुशार व्हायला लागली.

''या मुलीचं काय करावं मला अगदी कळेनासं झालंय'' मैत्रिण माझ्याजवळ कुरकुरली.'' हिला कुठेतरी थांबवायला हवंय.''

''का? चांगली कलाकुसरच शिकतेय ना? मग कुठे बिघडलं?'' मला मैत्रिणीच्या कुरबुरीचा रोखच कळला नाही.

''अग शिकायला काही हरकत नाही ग. पण त्यामुळे हिला प्रत्येक वस्तूमागचं तंत्रज्ञान कळून येतं आणि मग त्याच्या सौंदर्याचं कौतुकच उरत नाही. आपण म्हटलं किती छान भरतकाम आहे की ही लगेच म्हणणार त्यात काय? साधे टाके आहेत ते. अगदी सोपे असतात. तू सुद्धा करू शकशील... असं बरोबर नाही ग... सगळं यायला लागलं की इतरांच्या कलेची कदर उरत नाही तुम्हाला...''

तिचं म्हणणं खरंच होतं. आपल्यापाशी नसलेलं ज्ञान दुसरीकडे आढळलं तरच आपण नतमस्तक होतो नाहीतर मला सगळं ज्ञान आहे या गर्वाने मान ताठच रहाते... अगदी अवघडून जाईपर्यंत...

लहानपणी वाचलेल्या त्या गोष्टीच्या लेखकालाही हेच सांगायचं असेल का? आयुष्याच्या दालनाचा एकतरी दरवाजा शेवटपर्यंत बंदच राहू द्या. कारण कधीतरी तो उघडून पहायचाच ही जाणीवच तुमच्या जगण्यातली चेतना असते.






### * दु. का. संत

मराठी साहित्य संशोधनाची पायवाट तयार करणारे ज्येष्ठ संशोधक डॉ. दु. का. संत यांचे २ एप्रिल रोजी कोल्हापूर येथे निधन झाले. गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयात मराठीचे अध्यापक म्हणून त्यांनी काम केले. शिवाजी विद्यापीठाने डी. लिट्. (डॉक्टर ऑफ लिटरेचर) ही पदवी देऊन संशोधनाच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव केला आहे.

'संशोधन : पद्धती, प्रक्रिया, अंतरंग' हे डॉ. संत यांचे पुस्तक मराठीतील संशोधनपद्धतीवरील पहिले पुस्तक म्हणून ओळखले जाते. मराठी संशोधन आणि समीक्षेत त्यांनी संशोधनशास्त्र, विद्वत्ताशास्त्र आणि कलास्वरूपशास्त्र हे तीन प्रवाह आणले. ज्या वेळी स्त्रीवादी समीक्षा ही संकल्पनाही अस्तित्वात नव्हती, अशा काळात त्यांनी 'मराठी स्त्री' हे पुस्तक लिहून स्त्रीवादी विचार मांडला. 'साहित्य आणि संस्कृती', 'साहित्य संमेलने आणि साहित्यिक प्रश्न', 'ललितकला आणि ललित वाङ्मय' आदी त्यांची पुस्तके मराठी साहित्य संशोधनक्षेत्रात मूलभूत मानली जातात. 'मराठी स्त्री' आणि 'साहित्य आणि संस्कृती' या त्यांच्या पुस्तकांना मुंबई विद्यापीठाची तर्खडकर प्रबंध पारितोषिके मिळाली आहेत. अन्य संशोधकांच्या सहकार्याने त्यांनी 'केशवसुत : काव्यदर्शन', 'कलानीतिवाद', 'मुक्तेश्वरकृत सभापर्व (विवेचक अभ्यास)', 'नरेंद्रकृत रुक्मिणीस्वयंवर (विवेचक अभ्यास)' हे ग्रंथ लिहिले. अनेक विद्यापीठांमध्ये अतिथी व्याख्याते म्हणून त्यांनी व्याख्याने दिली.

### * रंगभूमीवरील ज्येष्ठ अभिनेते मधुसूदन कोल्हटकर यांचे निधन

व्यावसायिक रंगभूमीशी चार तपांहून अधिक काळ घनिष्ठ संबंध असलेले रंगभूमीवरील ज्येष्ठ अभिनेते मधुसूदन कोल्हटकर (वय ८०) यांचे मुंबई येथे ६ एप्रिल रोजी निधन झाले. 'बेबंदशाही'तील संभाजी, 'एकच प्याला'तील सुधाकर व 'नटसम्राट'मधील अप्पा बेलवलकर या त्यांच्या भूमिका गाजल्या. 'जय मंगल' या संस्थेमार्फतही त्यांनी अनेक नाटके सादर केली. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे त्यांना छत्रपती शाहू महाराज सुवर्णपदक देण्यात आले होते.

### * कवी सी. बी. दोडती यांचे निधन

वसईतील व्यासंगी साहित्यिक व कवी सी. बी. दोडती (७४) यांचे नुकतेच निधन झाले. दोडती यांची सहा कादंबऱ्या, दोन काव्यसंग्रह, एक लघुकथासंग्रह, एक बालगीतसंग्रह अशी साहित्यसंपदा आहे. 'सावट' या त्यांच्या कादंबरीला राज्य पुरस्कार मिळाला होता.

## खास सुट्टीसाठी...


'आई मी काय करु?

टी. व्ही.चा कंटाळा आलाय. त्याच त्याच गेम खेळून बोअर झालीय...काहीतरी नवीन आयडिया सांग ना...'

मुलांना हव्या असतात नव्या नव्या गोष्टी....

त्यांना हवी 'खास त्यांचीच' असलेली पुस्तकं..


ही सुंदर चित्रांची रंगीत पुस्तकं म्हणजे नव्या नव्या गोष्टींचा खजिनाच!



टिंबक टू



सुंठ-बिस्किटाचा माणूस




निद्राराणी



जादूचं खीरपात्र




नशीबवान शेखर



चतुर बोकोबा



# बालनगरी




## हॅरी पॉटर टॉक शो

### यशस्वी मुलांची धमाल उत्तरे

अनुक्रमणिका

जागृती ढेवरे- एच. एच. सी. पी हायस्कूल ५६

अनघा इनामदार- रेणुका स्वरूप हायस्कूल ५७

प्रणव गुमास्ते- मुक्तांगण इंग्लिश स्कूल ५८



**जागृती विजय ढेवरे**
**इ. ७वी, एच. एच. सी. पी हायस्कूल, पुणे.**

**१) मला जादूच्या शाळेत प्रवेश मिळाला तर!**

जर मला जादूच्या शाळेत प्रवेश मिळाला तर मी सर्वप्रथम तेथील सर्वांशी ओळख करून घेईन, सर्व मित्रमैत्रिणींशी ओळख करून त्यांच्याबरोबर गप्पाही मारेन. तसेच ती शाळा मी संपूर्ण बघेन. व तेथे मी विविध जादू करण्याचे मंत्रही शिकून घेईल. ती जादू कुठे कुठे वापरायची हे शिकेन, तेथे मी अनेक प्रकारच्या जादू करायला शिकेन. (उदा: जादूची कांडी, जादूचा कोट, जादूचा झाडू) अनेक जादू मी करेन व जादू करताना जरा काळजीही बाळगेन. जर मला कोणी त्रास देत असेल तर मी त्या व्यक्तीला बेडूक बनवेन व मी तिच्याकडून कबूल करून घेईन की पुन्हा असा कोणाला त्रास द्यायचा नाही. तेव्हाच मी तिला पूर्वस्थितीत आणेन, मला कोणी चोरी करताना दिसेल तेव्हा मी कोट घालून त्याला पकडून पोलिसांकडे देईन, किंवा मला वाटेल तेव्हा आकाशात जाण्यासाठी झाडूवर बसून आकाशात फिरेन.

**२)हॅरी पॉटर कडून कोणती जादूची गोष्ट मागाल?**

हॅरी पॉटरकडून मी जादूची कांडी घेईन व त्याची जादू शिकेन. काही वेळेस मला माझ्या मावशीकडे जावेसे वाटले तर मी तेथे जाईन. काही कारणास्तव माझा अभ्यास झाला नाही तर मी कांडी फिरवून पटकन अभ्यास पूर्ण करेन. जर चित्रकलेच्या तासाला बाईंनी दिलेले चित्र मला जमत नसेल तर मी कांडी फिरवून चित्र पूर्ण करेन. मी या जादूच्या कांडीचा फक्त स्वत:पुरताच उपयोग करणार नाही. तर लोकांसाठीही मी तिचा उपयोग करेन. म्हणजे जिथे मला घाण व कचरा दिसेल तो मी लगेच दूर करेन व तो परिसर स्वच्छ ठेवेने. प्रदूषणाचे दुष्परिणाम लोकांना सांगेन. वर्गात कोणी मला चिडवले तर मी त्याला गोल गोल फिरवेल. जर कोणी चोर चोरी करताना किंवा एखाद्या स्त्रीला छळत असला तर मी त्याला काठीने असा धडा शिकवीन की परत तो कुठल्या ही स्त्रीकडे मान वर करून बघणार नाही. रस्त्यावरच्या भिकाऱ्याला जादूच्या कांडीने कपडे व अन्न देईन. त्याला उद्योगासाठी एखादे साधन देईन. काही वेळेस माझ्या मैत्रिणीलाही या कांडीने मदत करीन. मी अनेक झाडेही लावेन.

अशा प्रकारे हॅरी पॉटरने दिलेल्या जादूच्या कांडीचा मी चांगल्या कामासाठी वापर करेन. स्वत:च्या व दुसऱ्यांच्या कामासाठी मी मदत करीन.





**अनघा अनिल इनामदार**
**इ. ६वी, रेणुका मेमो.हायस्कूल, पुणे.**

**१) मला जादूच्या शाळेत प्रवेश मिळाला तर!**

मला जादूच्या शाळेत प्रवेश मिळाला तर सगळ्यात पहिली जादू मी शिकेन ती म्हणजे मला व माझ्या मैत्रिणींना जी गोष्ट हवी आहे ती ताबडतोब मिळवणे. मला नेहमी वाटते की मैत्रिणींबरोबर भरपूर आईस्क्रीम खावे, पावभाजी खावी. सहलींना जावे. निसर्गरम्य ठिकाणे पाहावीत. तसेच ही जादू शिकून मी माझ्या छोट्या दोस्तांना, बालवाडीतल्या छोटुकल्यांना पाहिजे तिकडची सफर घडवून आणेन. अगदी उन्हाळ्याच्या दिवसात मी जादूने आपल्याकडच्या वातावरणात एकदम थंड हवा निर्माण करीन की जेणेकरून लोकांना उन्हाचा जास्त त्रास होऊ नये. या माझ्या जादूने मी सर्व आजी-आजोबांना बसल्या ठिकाणी त्यांना पाहिजे त्या तीर्थक्षेत्राची सहल करून आणेन. खास अशी जादू शिकायला मिळणे एक मोठी आनंदाची पर्वणीच आहे.

मला जर ही जादू शिकता आली तर मी खूप पुस्तके वाचेन, शंख-शिंपले गोळा करेन. जादू म्हणताच मी लहान मुलांसारखीच उत्साहाने, उल्हासाने भारून जाते. पाहिलेली जादू शिकण्यासाठी आतूर होते.

**२)हॅरी पॉटर कडून कोणती जादूची गोष्ट मागाल?**

हॅरी पॉटरकडून मी पहिली वस्तू घेईन ती म्हणजे त्याची जादूची छडी.

त्या छडीने मी मला हवी ती गोष्ट घडवून आणेन. उदा. मला शाळेत जायला उशीर झाल्यास मी घड्याळाचे काटे थोडे मागे फिरवेन, बस चुकल्यास त्या एका छडीने एकाएकी अदृश्य होऊन क्षणात शाळेत पोचेन. अर्थात हे मी म्हणते आहे खरे पण हे सर्व प्रत्यक्षात मुळीच घडणार नाही.

हं, जर मात्र मला छडी मिळाली तर मी सुनामी लाटांच्या संकटाचे निवारण माझ्या जादूच्या छडीने करेन. तसेच आलेल्या संकटात मी माझ्या जादूच्या छडीने लोकांना घरे, अन्न-पाणी यांची व्यवस्था करीन.



**प्रणव प्रसाद गुमास्ते**
**इ. ८वी, मुक्तांगण इंग्लिश स्कूल,**
**पुणे.**

**१) मला जादूच्या शाळत प्रवश मिळाला तर!**

जर का मला जादूच्या शाळेत प्रवेश मिळाला तर मी ग्रीफँडार मध्ये जाईन. मला एक्स्पेटो पॅट्रोनम ची जादू आवडते. हॅरीने ती जादू हॅरी पॉटर आणि आस्काबानचा कैदी यात वापरली होती. त्याने ती जादू डेमेंटरसच्या विरुद्ध वापरली होती. मी ती स्वसंरक्षणासाठी आणि पररक्षणासाठी वापरेन. मी गार्डियन लेवीचे ची पण जादू शिकेन. त्याच्या सहाय्याने ड्रॅको मॅलकॅप च्या हालचाली माझ्या नियंत्रणाखाली आणेन. हॅरीप्रमाणे मला पण सगळे स्पेल्स करून बघायला आवडतील. मला फायर बेल्टधारी स्नीकर व्हायला आवडेल. मग मी त्याने स्नीच पटकन पकडेन. आणि माझ्या टीमला विजय मिळवून देईल.

**२)हॅरी पॉटर कडून कोणती जादूची गोष्ट मागाल?**

मी त्याच्याकडून स्पेल ऑफ गार्डिना ची जादू शिकेन. त्याने आपल्याला हात न लावता काहीही हवेत उचलता येते. मी हॅग्समेड मध्ये जाईन आणि बटर बीकर पैसे न देता पीईन. मी जादू वापरून माझ्या बाकीच्या मित्रांनापण घेऊन देईन. खास करून रेन आणि हरमॅओनी. मी सर्वात चांगल्या ब्रूममेकर कडे जाईन आणि सर्वात चांगली ब्रूमस्टीक घेईन. मी माझ्या सर्व मित्रांना फुकट पार्टी देईन.


**आजच ही पुस्तके घ्या आणि...... सुट्टीत मजेमजेची खेळणी बनवा... हो जाय शुरु...**

| | | |
|---|---|---|
| खेळणीच खेळणी | डी. एस् . इटोकर | ६०रु. |
| फक्त खेळण्यासाठी | डी. एस् . इटोकर | ६०रु. |
| वैज्ञानिक खेळणी | डी. एस् . इटोकर | ५०रु. |

व इतरही अनेक... संपूर्ण सूची मागवा. आमच्या वेबसाईटला भेट द्या.

**website- www.mehtapublishinghouse.com**

आमचा पत्ता: मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ३०





◆मे २००५
◆ वर्ष पाचवे
◆ अंक पाचवा


# मेहता मराठी ग्रंथजगत


संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस


*— अनुक्रमणिका —*


**संपादकीय** - ४
**साहित्यवार्ता** ७
**पुस्तक परिचय**
**खेकडा** : रत्नाकर मतकरी ३०
**ओमेर्ता** : मारिओ पुझो अनु. अनिल काळे ३५
**ग्यानबाचं विज्ञान** : डॉ. बाळ फोंडके ४२
**पुरस्कार** ४६
**साधंसुधं** ५०
**श्रद्धांजली** ५३
**बालनगरी** ५५



मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**
**Website - mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*